
प्रचितीच्या
गोष्टी
विनीता देशपांडे

# प्रचितीच्या गोष्टी

## विनीता श्रीकांत देशपांडे

## ई साहित्य प्रतिष्ठान

# प्रचितीच्या गोष्टी

विनीता श्रीकांत देशपांडे.

फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण,

निगडी पुणे ४११ ०४४

मो.नं. ७०५७५७४२७२/ 7218350078

मेल- vsdeshpande14@gmail.com

कव्हरचित्रकार- लीना आढाव

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गाव कळवा)

**प्रकाशन :२२ ऑक्टोबर २०२४**



©esahity Pratishthan®2024

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.



विनीता श्रीकांत देशपांडे
एम.ए.(मराठी), एम.ए(इंडॉलॉजी)

विनीताजींच्या प्रतिभेचा आवाका कथा, कविता, कादंबरी, समिक्षा लेखन, आकाशवाणी पुणेकेंद्रावरून काव्यवाचन, अनेक मासिक, दिवाळी अंक आणि वृत्तपत्रांसाठी लेखन असा व्यापक आहे. "स्मृत्पर्ण" या ई-साहित्य प्रकाशित पहिल्या कादंबरीवर वाचकवर्ग आपल्या प्रतिक्रिया पाठवत आहेत. ई- साहित्य प्रकाशित "मराठी कवितेच्या पाऊलखुणा" इ.स.हे सन १८०० ते सन१९०० याकाळातील कवी आणि त्यांच्या काव्यप्रवासाचा आढावा या लेखसंग्रहात घेतलेला आहे. ई साहित्यतर्फ़े त्यांच्या फ़ुल्लारी ,रंगीला रे, अभ्यंतर आणि मण्यांची टोपी याही कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. त्यांच्या या पाचही कादंबऱ्या वेगळ्या विषयांवरच्या आणि वेगवेगळ्या घाटाच्या आहेत.

विनीताजींचे कार्यक्षेत्र केवळ लेखनापुरते मर्यादित नसून त्यांचे इतर कार्यही खाली देत आहोत.

सचिव, वाकणकर शोध संस्था (अकॅडमिक काउन्सिल) उज्जैन

- लेखन, अनुवाद (हिन्दी, मराठी, इंग्रजी)

- अनेक मासिके, दिवाळी अंक, वर्तमानपत्रातून कथा, कविता, पुस्तक परिक्षण लेखन प्रकाशित

- हिन्दी अनुवाद -बिम्बब्रह्म तथा वास्तुब्रह्म (लेखक -डॉ. गो.बं. देगलूरकर) प्रकाशक : अपरांत

- हिन्दी अनुवाद - सुरसुंदरी (लेखक डॉ. गो.बं. देगलूरकर) प्रकाशक : अपरांत

- हिन्दी अनुवाद - "मेरी पुराकथा(लेखिका- आनंदीबाई कर्वे

- हिन्दी अनुवाद - "विरासत का वैभव" प्रकाशक; संस्कार भारती, पश्चिम महाराष्ट्र प्रांत

- स्फुर्तिदायक समर काव्य - प्रकाशक : भारतीय विचार साधना, पुणे

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था (डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, स्थापना इ.स.१८९४) द्वारा पुरस्कृत

आगामी साहित्य- "भवताल" कथासंग्रह, "त्रेधा"कथासंग्रह आधुनिक मराठी कवितेच्या पाऊलखुणा(इ.स. १९००च्या पुढचा काव्यप्रवास). वाचकांच्या उदंड आग्रहावरून स्मृत्पर्णचा उत्तरार्ध

"पांथस्थ" - पद्मश्री डॉ. विष्णु श्रीधर वाकणकर यांचे जीवन चरित्र


विनीताजींच्या ई साहित्यवरील पुस्तकांची माहिती व लिंक पुढे दिलेल्या आहेत.


संपर्क- फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४


मो.नं. ७०५७५७४२७२

मेल- vsdeshpande14@gmail.com


# विनीता देशपांडे यांची ई साहित्यवरील साहित्य संपदा












विनीता देशपांडे


मण्यांची टोपी
विनीता देशपांडे


पारुषण
विनीता देशपांडे

- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/paoolkhuna_vinitadeshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/smrutparn.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/fullari_vinita_deshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/rangeela_vinita_deshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/abhyantar_vinita_deshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/manyachi_topi_vinita_deshpande.pdf
- https://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parushan_part_1.pdf

# प्रचितीच्या गोष्टी

**या प्रचितीच्या गोष्टी। प्रचित पाहावी आत्मदृष्टीं।**

**प्रचितीवेगळे कष्टी। होऊंच नये॥**

*(दासबोध, दशक १०, समास १०.६७)*

अनुभवांनी समृद्ध आप्तेष्टांना समर्पित

# मनोगत

प्रत्येकाचे आपले भावविश्व असते, आपले अनुभव असतात. हे अनुभव आपले आयुष्य समृद्ध करत असतात. अनुभवांचा परीघ जसा जसा वाढत जातो तसा तसा जाणीवांचा परीघ वाढत असतो. या जाणीवा आपल्या जगण्याच्या उद्देशाला बळ देतात. या संग्रहात आठ कथा आहेत. माझे भवताल, अभ्यंकरांचा पायताण, प्राक्तन शोधणारी चारुलता, दान नाही मदत करुन आपल्या आईची इच्छा पूर्ण करणारा जयवंत, वृंदावनातील विझलेली पणती पुन्हा पेटवणारा अविनाश, मनात शल्य घेऊन मोक्षासाठी आसूसलेली रंजना, आयुष्याच्या सांजवेळी फुलणाऱ्या निखळा मैत्रीतील सदानंद, अव्यक्त प्रेमाचे क्षण शोधणारा मन्या. या कथा माझ्या आयुष्यात घडलेल्या घटनांवर, मी साक्षीदार असलेल्या प्रसंगांवर आधारित आहेत. हे अनुभव वाचकांना ही समृद्ध करतील हीच आशा.

विनीता श्रीकांत देशपांडे

# कथानुक्रम

१. भवताल

२. पायताण

३. प्राक्तन

४. दान नाही...मदत

५. वृंदावन

६. मोक्ष

७. सदानंद

८. अव्यक्त

# भवताल

सकाळचे नऊ वाजले. डब्बे घेऊन आमचे हे अर्थात नवरोबा ऑफिसला आणि मुलं कॉलेजसाठी निघाली. सवयीप्रमाणे मी स्वयंपाकघर आवरलं. जीवनात एक पाऊल पुढे रहाण्यासाठी टी.वी.वर झी चोवीस तास चॅनल लावलं. त्याच त्याच बातम्या चहाच्या घोटासोबत मी ऐकत होते. आपण या विश्वाचा एक अविभाज्य घटक असल्याची जाणीव या बातम्या ऐकल्यावर तीव्रतेने होते. संकष्टी चतुर्थीचा दिवस होता. उपासाचं काय करु या विचारात असताना मोबाईल वाजला. दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात काकांना भरती केलं होतं. आधी यांना अर्थात नवरोबाला फोन करुन सांगितलं.

"अगं, सरळ कॅब करुन जा" फोनवर नवऱ्याचं काळजीयुक्त सजेशन

"नको, मी जाईन लोकलने." मी उत्साहात म्हणाले

"हल्ली लोकलला खूप गर्दी असते. म्हणून मी कॅब म्हणत होतो." नवऱ्याचा आग्रह सुरुच

"बरं बघते." असं म्हणत फोन ठेवला आणि परवाची पुणे-मुंबई रस्त्यावर लागलेली गर्दी आठवली.

कॅब, बाप रे! मुंबई-पुणे रस्त्यावर किती गर्दी असते. पोहचायला उशीर होईल. कशाने ही जा....गर्दी टाळणे शक्य नाही. शिवाजीनगरपर्यन्त लोकलने जाऊ... तिथून पुढे रिक्षा किंवा कॅबने जाऊ या विचारात मी पटापट आवरलं.

अकुर्डीवरुन सव्वादहाच्या लोकलने निघाले. दोन तीन वर्षांपूर्वी खरं तर सव्वादहाच्या लोकलला फार गर्दी नसायची. आताशा प्रत्येक लोकलला गर्दी असते. शेवटच्या लेडिज डब्ब्यात चढले. प्रचंड गर्दी होती. धक्काबुक्की करत दोन बाकांमध्ये उभं रहायला जागा मिळाली. इअरप्लग काढून गाणे ऐकावे मनात आलं पण मोबाईल जेमेतेम चाळीसटक्के चार्ज होता. नको बॅटरी संपवायला म्हणून त्या कल्लोळात सहप्रवाश्यांवर नजर फिरवली. संवाद, एवढ्या गदारोळात जमेल तसा जमेल तो संवाद साधतांना बघून मजा वाटली. त्या लेडीज डब्यात माझ्यासारख्या कधीतरी प्रवास करणाऱ्या होत्या तसेच रोजच्या प्रवासात जुळलेल्या मैत्रीणी होत्या. इशाऱ्याने एकमेकींसाठी जागेची तरतूद चालली होती. कोणी जप करत होतं. कोणी न्याहरी तर कोणी अभ्यासाचं पुस्तक वाचत होतं. कोणी गाणं ऐकत होतं, तर कोणी मोबाईल वर गेम खेळण्यात व्यस्त होतं. सगळे आपआपल्या जगात व्यस्त असतांना मी त्यांच्या जगात डोकावून बघत होते. कशासाठी? माहित नाही. कदाचित विरंगुळा? कदाचित भवताल खुणावत होता.

शेजारी दोन मैत्रीणींच्या गप्पा सुरु होत्या. बोलता बोलता मध्येच खदखदत होत्या. भुवया उंचवून एकमेकींना चिडवत होत्या. लाजत होत्या. मुलांवरुन गप्पा सुरु होत्या हे त्यांच्या देहबोलीवरुन मला लक्षात आलं. एवढ्या गर्दीत एकीने दुसरीला मोबाईलवर फोटो दाखवले:

"शपथ्थ! कसला हॉट आहे ग."

"हम्म. पण गटवलाय सुचेताने."

"तुझं काय झालं? तो एअरटेल गॅलरीत काम करणारा....."

"काय? नुसत्याच बोंब मारायचा. कधीतरी हॉटेलात न्यायचा. पंकज उदास टाइपचा होता. दिला सोडून."

"बरं झालं. आमचं किती दिवस टिकतय माहित नाही. कुरबुर चाललीय नुसती. किती तडजोड करायची यांच्यासाठी?

"हो ना. महिन्यातून एखादा पिच्चर, एखादं होटल...एखादं बाग ....हे काय आयुष्य आहे?"

त्यांच्या या गप्पा ऐकून सुन्न झालेली मी आायुष्यावर विधान करणाऱ्या त्या पोरींच्या वयाचा अंदाज घ्यायचा प्रयत्न करु लागले. पण छे...स्कार्फ गुंडाळला होता चेहऱ्याभवती. असतील विशीतल्या. त्यांच्या आवाजावरुन अंदाज काढत त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्नात असतांना तिथल्या बाकावरील आजींने विचारले...कासारवाडी आले का?

"वेळ अजून आज्जी. दोन स्टेशन जायची अजून. मी सांगते आले की." अभ्यासात मग्न बाजुला बसलेली सालस मुलगी म्हणाली.

"इंजिनिअरींग का? "

"हो...दुसरं वर्ष.." म्हणत तिने परत पुस्तकात तोंड खुपसलं

चला बसायला जागा मिळेल मला बरं वाटलं. पर्स एका खांद्यावरुन दुसऱ्या खांद्यावर घेत मी उजवीकडे फिरले. मनात आलं इकडचं पब्लिक कसं आहे बघावं. डोळे उघडबंद करत अवतीभवती नजरा फिरवत मध्यमवयीन दोघी अथर्वशीर्ष म्हणत होत्या. तेवढ्यात चिलीमिली..चिप्स विकणारी बाई आली. अथर्वशीर्षात खंड न पाडता ब्लाऊजमधून वीसची नोट काढत तिने खुणा करत तिनं पॅकेटस घेतले.

"वरचे दोन रुपये" ती चीप्सवाली म्हणाली

"एकवीस झाले न... पुढच्या खेपेस देते." मंत्र अर्ध्यावर सोडत ती बाई म्हणाली

"काय तुमची कटकट...दरवेळेस वरचे पैसे पुढच्या खेपेस देणार, मागचा रुपया पण दिला नाही. असं केलं तर मी काय कमवणार."

ती बाई मात्र ढिम्म ..... वाट बघून चिप्स...चिलीमिली....करत ती वैतागून पुढे निघून गेली.

गणपतये..त्वमेव प्रत्यक्षं... तत्वमसि...कानावर पडू लागले.

हे बरंय...आपले प्रश्न सुटले नाही किंवा सोडवता आलं नाही की देवाच्या नावाचा आधार घ्यायचा. आयुष्याची पळवाट शोधणं म्हणतात ते हेच का? बरंय..... माझ्या मनात विचार आला.

तेवढ्यात आज्जीला मघाच्या मुलीकडून त्यांच स्टेशन येण्याची वर्दी मिळाली. गर्दी बघून घाबरलेल्या त्या आज्जीला तिथल्या मुलींनी पुढे जायला मदत केली. उंचीला कमी असलेल्या त्या आजीचे वय सत्तरीच्या आसपास असेल. एका हाताने पोटाशी पिशवी पकडत दुसऱ्या हाताने बाकाच्या दांड्याला धरत ती गेटपर्यन्त पोहचली आणि माझ्या जीवात जीव आला. त्यांच्या जागेवर बसताच...समोरच्या एका धिप्पाड देहानं मला विचारलं.

"काय! शिवाजी नगर काय?"

"हो." त्या आजीच्या डोळ्यातील दाटून आलेले अश्रु मला दिसले आणि नजरेने त्यांना शोधत मी त्या धिप्पाड देहाला उत्तर दिलं

आज्जी उतरणाऱ्यांच्या गर्दीत हरवून गेली. विवंचना कोणाला नाही...कोणी याला दैवाचे भोग म्हणतं...कोणी प्रारब्ध...कोणी काय...प्रत्येकाचा बघण्याचा दृष्टीकोन, जो-तो त्याला हवं ते ठरवत असतो. व.पुं च वाक्य आठवलं...."रोजच्या जगण्यात पैसा....नाती...यापलीकडे प्रश्न अस्तित्वात नसतो"... असेल आज्जीचे आपले काही कारण. मला कळल्याने ते सुटले असते का?

"दगडूशेठ का?" माझ्या प्रश्नार्थक चेहऱ्याकडे बघत धिप्पाड देहानं मला परत विचारलं

"नाही. दवाखान्यात" म्हणजे मी देवभोळी असावी, किती सहज अंदाज केला तिनं. खरच आहे, अशा या अंदाजावर तर जगाचे अर्धे व्यवहार होतात.

थोड्यावेळाने लालजांभळ्या भडक्क साडी नेसलेल्या त्या धिप्पाड देहाने आवेशात चंची काढली आणि हातावर तंबाखु चोळू लागली.

"जीवन यांना कळले हो" चा आव तिच्या भाषेत आणि वागण्यात जाणवला. चुनामिश्रीत त्या तंबाखुचा दर्प असह्य होऊन त्या बाकावर बसलेल्या आम्ही तिघी चौघींनी हातात येईल ते नाकाला लावले. असतात अशी मंडळी. असेलही कदाचित आयुष्याचा दांडगा अनुभव... या विचारात मी इतर सहप्रवाश्यांकडे बघू लागले.

डब्यातला थोडा कल्लोळ कासारवाडीच्या स्टेशनवर उतरला आणि नवा कल्लोळ डब्यात शिरला. नवे प्रवाशी नवा कल्लोळ.....प्रत्येक स्टेशनवर नवा कल्लोळ उतरत चढत होता. गाडीत संवाद...संवाद...आणि या संवादात माझ्या कानावर वेगवेगळे वाक्य पडत होते.....नवे शब्द ऐकू येत होते.....त्यातून मी माझे नवे वाक्य तयार करत होते. एवढ्या कल्लोळात मात्र एक लक्षात आलं ते म्हणजे जीवन आहे तसं जगणं.....जगण्याच्या धावपळीतील काही क्षणांचे ते माझे सहप्रवासी होते. आयुष्य जगण्याची आसक्ती मी प्रत्येक चेहऱ्यावर बघत होते.

प्रत्येक चेहरा मला काहीतरी सांगत होता. कोणाला ऑफिसमध्ये त्रास, कोणाला घरी त्रास, कोणाला कॉलेजमध्ये त्रास, कोणाला सहकर्मींचा त्रास, कोणाला बहिण भावांचा..अगणित नात्यांचा. त्रास कोणालच चुकला नव्हता. धडपड सारेच करत होते. त्यांच्या जगण्याच्या जिद्दीने मला भुल घातली. त्या जिद्दीपुढे एक पाऊल पुढे असलेल्या त्या बातम्या त्या घडामोडींची तुलना करणे शक्य नव्हते. जगण्याची शर्यत असते. जगाच्या पाठिवर कुठे काहीही घडो....माणूस आपलं जगणं सोडत नाही.

जगण्याची आस मुठीत घेऊन मी शिवाजीनगर स्टेशनवर उतरले. चोहिकडे गर्दीच गर्दी... या गर्दीत आज माझा जीव घाबरला नव्हता. लोंढा जाईल तसे मी पुढे जात होते. अनोळखी चेहऱ्यांवर ओळखिचे काही तरी शोधत होते.

स्टेशनबाहेर गर्दी पांगली. जो तो मार्गस्थ झाला. कोणी बसने...कोणी रिक्षाने...झपाटल्यासारखे सगळे सहप्रवासी एकेक करत निघत होते, जगण्याच्या धडपडीतील पुढचा टप्पा गाठायला..

स्वारगेटपर्यन्त सवारी घेऊन जाणाऱ्या रिक्षांना टाळत मी पुढे जात होते. ज्यूस किंवा ताक पिण्याची अनावर इच्छा झाली....ती टाळत पुढे जात होते. गर्दी पार करत आकाशवाणीच्या आधीच्या चौकात रिक्षा मिळाली.

"कुठं?" बाहेर मुंडक काढत एका शिडशिडीत ऑटोवाला माझ्याजवळ थांबला

"दिनानाथ." मी म्हणाले

"बसा की." मीटर पाडत तो चालक म्हणाला

ऑटोत बसले. खांद्यावरची पर्स हातात घेत मी पाण्याची बाटली काढली. गटागट पाणी प्यायले.

"काय? पुणं पण तापायला लागलय नाही हल्ली." रिक्षेवाला आरशातून माझ्याकडे बघत म्हणाला

"ह्म्म" मी उत्तर दिलं

"टेन्शनमध्ये दिसताय. दवाखाना वाईटच...एकदा मागे लागला की विचारु नका." गर्दीतून वाट काढत तो माझ्याशी बोलत होता

"हो. ना." मी. काय सांगणार त्याला. काका हार्टपेशंट आणि वय झालं होतं. जरा त्रास वाटला म्हणून दवाखान्यात आणलं होतं. वहिनीला सुट्टी मिळाली नाही. सो तडजोड....ती येईपर्यन्त अटेन्ड करायचं.

सिग्नल आणि गर्दीतून वाट काढत आम्ही दिनानाथला पोहचलो.
"जुनी की नवी इमारत?" गेटमधून जातांना त्याने विचारलं

"नवी" मी

"नका काळजी करु. होईल सर्व व्यवस्थित...."म्हणत त्याने पैसे परत केले.

तो काळजीने बोलत होता मी मात्र ढिम्म होते...मघाच्या अथर्वशीर्ष म्हणाणाऱ्या त्या मध्यमवयीन बाई सारखी. हा विचार येताच मला माझीच लाज वाटली.

"हो दादा. होईल सर्व व्यवस्थित. आणि धन्यवाद हं" मी प्रतिउत्तर दिलं तसं त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचं स्मित बघून मनात आलं, हा कोण कुठला..ना ओळखीचा ना पाळखीचा...धीर देतोय ऑटोत बसल्यापासून आणि वर स्पेशलरुममध्ये ॲडमिट काकांच्या दोन मुलांमध्ये बोलचाल नाही....तू करतो तर मी नाही....एकमेकांचे वैरीच जणु. जन्मदात्या पित्याला दोनमुलांपैकी एकाला निवडावं लागत होतं. वडिलांच्या तब्येतीपेक्षा त्यांचा इगो महत्वाचा होता. आणि हा ऑटोवाला.... नातं नाही...गोतं नाही...तरी व्यवस्थित होईल...म्हणत होता. त्रयस्थ....आपल्या आयुष्यात प्रत्येक त्रयस्थाची हीच तर भुमिका असते. कधी कधी ऑटोवाल्यासारखे त्रयस्थ आपल्या आयुष्यात समाधानाचा फॅक्टर ॲड करतात.

काऊंटरवर अटेंडन्ट पास घ्यायला मी रांगेत उभे होते. त्या विशाल आणि अद्यावत यंत्रणेनी सुसज्ज दवाखान्यातील नवीन इमारतीत भायण शांतंता पसरली होती. पेशंट आणि पेशंटच्या नातेवाईकांसाठी जणु आयुष्य थांबून गेलं होतं. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर चिंता..काळजी...कोणाला तब्येतीची..कोणाला पैशाची..काळजीने वेढलेल्या त्या वेटिंगरुम वजा हॉलमधून मी लिफ्टजवळ आले. ठळक अक्षरात त्यावर सम-विषम मजले लिहले होते. पुष्कळ वेळ वाट बघितली. लिफ्टचे सम-विषम...गणित जुळेना. शेवटी ठरवलं, जी आधी येईल त्या लिफ्टमध्ये चढायचं....८व्या मजल्यावर जायचं ना... विषम मजल्यांवर थांबणाऱ्या लिफ्ट मध्ये चढले....मनात आलं ७व्या मजल्यावर उतरुन एक मजला चढून जाऊ का? सातवा

मजला आला आणि गेला.. नवव्या मजल्यावर लिफ्ट थांबली. मग काय? उतरले आणि ८व्या मजल्यावर पोहचले......सोप्प...अपण आयुष्यात सोप्पे मार्ग शोधत असतो ना...

रुमवर गेले तर काकी काकांशेजारी बसली होती. तिच्या चेहऱ्यावर काळजी स्पष्ट दिसत होती. आणि हे सहाजिक होतं असं आमच्या काकीच्या बाबतीत म्हणणं चुकीचे ठरेल. काकी म्हणजे माहेरची साने. रुवाब आणि करडा धारधार आवाज, ऐकताच धडकी भरेल असा आणि तिची शिस्त म्हणजे एकदम कडक. काका काय आम्ही सगळेच तिला खुप घाबरायचो. तिचा दरारा म्हणजे काय सांगू? आठवलं तरी आजही छातीत धडधड उठते. या शिस्तीच्या अतिरेकामुळेच कदाचित घर दुभंगल असावं. माझेच सख्खे चुलत भाऊ पण त्या दोघात नक्की काय बिनसलं खरं कारण कळलंच नाही. यात बिचाऱ्या सदाकाकाची फरफट झाली एवढच. ते दोघं भाऊ एकमेकांची तोंड बघत नव्हती हेच काय माहित होतं. त्यामुळे जो भाऊ काकाकाकीचे करतो त्याच्याकडे आमचं येणं जाणं होतं. दुसरा भाऊ कार्यप्रसंगात भेटला की तेवढी विचारपुस....बस्स.

काका निर्लेप नजरेने दवाखान्यातील छताकडे बघत होता. सुटकेची वाट बघत होता.....बहूतेक......बायकोच्या कटकटीपासून... मुलांच्या भांडणापासून...... खरंच त्याने आयुष्याबद्दल काय विचार केला असेल...काय स्वप्न बघितलं असेल.... माझ्यासमोर त्याचं जे आयुष्य होतं....मला तर त्याची फरफट दिसत होती. कुठल्याही कार्यक्रमात नेहमीच नातेवाईकांच्या चेष्टेचा विषय असलेला काका, काकूच्या मर्जीसाठी स्वत:च्या आवडी-निवडींना तिलांजली देणारा काका, ज्या मुलांसाठी जीवाचं रान केलं म्हातारपणी त्याच मुलांनी इस्टेटीसकट त्याची वाटणी केली होती. त्याची अगतिकता बघवत नव्हती आणि काकीची काळजी त्या क्षणी

थोतांड वाटत होती. तिला काकांच आजारपण काढायचं जीवावर आलं होतं. प्रेमाशिवाय..जिव्हाळ्याशिवाय पसरलेल्या त्या नात्यात ओढ नव्हतीच. मग तिच्याकडून सेवेची अपेक्षा कशी करायची? काका गेला तर सुटेल माझ्या या विचाराने मीच दचकले. काकाची कीव आणि काकीचा राग मनात खदखदत होता. मी निशब्द होते. तिला मी असं हतबल प्रथमच बघत होते. मला बघातच तिला रडू आवरलं नाही. अश्रुंमागचं कारण काहीही असो, तिथं प्रथम सांत्वन हवं असतं......व.पु.काळे म्हणतात ना. त्याक्षणी माझी इच्छा नसली तरी मला सांत्वन करणं भाग होतं. आत्ता माझी जी अवस्था होती....इच्छा नसतांना सांत्वन करण्याची तीच अवस्था माझ्या त्या काकाची जन्मभर होती.....कसं केलं असेल काकानं. तेवढ्यात नर्स आली. चेकअप झाला. टेस्टस लिहून दिल्या.

तासाभरात दादा-वहिनी आले. काकांच्या टेस्टस आणि येणाऱ्या नातेवाईकांशी बोलण्यात संध्याकाळ कधी झाली कळलेच नाही. मी निघणार तेवढ्यात काकीने माझा हात हातात घेतला. दोघीही निशब्द होतो. मला कळायचे ते कळले होते. तिला झालेल्या पश्चातापाला त्या क्षणी काहीही अर्थ नव्हता. हातून वेळ नाही मोठा काळ निसटला होता. तिच्या पश्चातापाने माझ्या सदाकाकाचे आयुष्य बदलणार नव्हते. मी निघाले. बाहेर पेशंटच्या आप्तेष्टांची ये जा... डॉक्टर...नर्स....इतर स्टाफ यांची मंद स्वरात कुजबुज हे सर्व पार करत मी खाली आले. आधी रिसेप्शन काउंटरच्या मागे असलेल्या कॅन्टीनमध्ये गेले. साबुदाणा वडा आणि चहा घेत कोपऱ्यावरच्या एका टेबलवर जागा मिळवली. दोन घास आणि चहा घेतल्यावर तरतरी आली. परत चोहिकडे बघितलं. जीवघेणी शांतता मला बैचेन करत होती. जगवण्याचे प्रयत्न करणाऱ्या त्या वास्तुत मी जीवंतपणा शोधत होते. ठरवलं. आलं तसच जायचं.

गेटबाहेर रिक्षा थांबवली.

"शिवाजी नगर" मी

"बसा की" रिक्षावाला

"काय ट्रॅफिक वाढलाय पुण्यात..." मी बोलायला सुरवात केली

"हो ना. सगळीकडे गाड्याच गाड्या....." रिक्षावाला

"परत चालवण्याची शिस्त नाही.." मी

"जे.एम.रोडवरच्या वन वे नी काय लाभ...काहीही नाही..." रिक्षावाला

या संवादात स्टेशन केव्हा आले कळलेच नाही. प्लॅटफॉर्मवर किलबिलाट....गर्दी......संवाद.....आणि एक जीवंतपणा. तो कल्लोळ कानात साठवत असतांना लोकल आली आणि जगण्याची उमेद मुठीत घेऊन मी लोकलमध्ये चढले.

"आज बॉस कशाला भडकली ग तुझ्यावर?" ठोपर मारत एकीने विचारलं

"अग! तो राजेश भारीच हं. मला डोळा मारला अन बघितलं न दिवटीनं." दुसरी

"अय्या! बॉस ती....तिनं का? मग?" पहिली

"बघितलं तर बघितलं. गेली उडत." दुसरा हसरा आवाज

"सासुला उपवास आहे आज. सगळं रांधावं लागेल?" एक उदास संवाद

"तिनं आपल्या सासूला खाऊ घातलं होतं का गरम गरम? विच्चारायचं की" एक खमका संवाद

"अरे! स्टेशनवर नको येऊ. कोणी बघितलं म्हणजे. उद्या भेटू न. प्लीज." एक लडिवाळ संवाद

"अरे, बॅटरी संपत आली आहे. रात्री दहा नंतर चॅट करु." लाजरा संवाद

आणि त्या अगणित संवादात माझा परतीचा प्रफुल्लित प्रवास सुरु झाला.

थकवा....छे! हुरुप आला होता. माझं घरटं माझी वाट बघत होतं.

# पायताण

"अनुबंध" आमच्या कॉलनीतील लायब्ररी. आमच्या इतकी जुनी, पस्तीस वर्षांपूर्वी आम्ही या सहकार नगरात रहायला आलो आणि पाठोपाठ दामले काकांची घरघुती लायब्ररी सुरु झाली. भवतालच्या वाचकवर्गामुळे रुजली, वाढली आणि मग स्थिरावली. या आधुनिक काळात कंप्युटर आणि मोबाइलवर पुस्तकं वाचता न येणाऱ्या आमच्या सारख्या वाचकांना ही लायब्ररी एक वरदान आहे म्हणा. दामले काकांना गेल्या वर्षी देवाज्ञा झाली. मुलगा-सुन यांनी एक लायब्रेरीयन नेमली आणि दामलेंच्या राज्यात सहजपणे वावरणारा मी आता बिचकत वावरु लागलो. जाड भिंगाचा चश्मा लावलेली जाडसर लायब्रेरियन, तिचा आवाज तिच्या शरीरयष्टीला साजेसा होता....जाडाभरडा. मनातल्या मनात मी तिला मी "जाडे" म्हणायचो.

पुष्कळ वर्षे झाली असतील. माझ्या म्हणण्यावरुन या लायब्ररीच्या बाहेर दामलेंनी बाहेर एक सुचना फलक लावला होता. "पायताण आणि ताण बाहेर ठेवून आत यावे." आज पायताण काढतांना लक्षात आलं की फलकावरील अक्षरं पुसट होत चालली आहे. आठ-दहा वर्षांपूर्वी अक्षरांवर चढलेल्या त्या शाईने तरी किती तग धरायची नाही का?

"दिवाळी अंकाचे पैसे भरले नसतील तर येत्या आठवड्यात भरा. नाही तर अंक मिळणार नाही." लायब्रेरीयन करड्या आवाजात म्हणाली

"उद्या भरतो न." मी अर्थात रणजीत अभ्यंकर म्हणालो

"अमृत मासिक परत आणले का हो?" एका प्रौढ वाचकाने विचारले

"कोणी?" लायब्रेरीयन

"देशमुखांनी. अहो, पंधरा दिवसांपासून मागतेय मी अमृत मासिक. आम्ही फी वेळेत भरतो." तो वाचक खोचकपणे म्हणाला

"ह्म्म. सांगितलं आहे. बघते." लायब्रेरीयन

"बघते काय? रोज हेच उत्तर देता तुम्ही." प्रौढ वाचक

"हा घ्या त्यांचा फोन नंबर. तुम्हीच विचारा." लायब्रेरियन कंप्युटरवरुन नंबर देत म्हणाली

हे ऐकून प्रौढ वाचकाचा चेहरा पडला होता. तुम्ही पुस्तक वाचता की नाही. बोध घेता की नाही. याच्याशी तिचा काही संबध नसतो. ती फक्त माध्यम असते तुमच्यापर्यंत पुस्तक पोहचवण्याचं. सतत पुस्तकांमध्ये रहाणारी ही लायब्रेरियन किती पुस्तकं वाचत असेल माझ्या मनात प्रश्न डोकावला.

"अहो, साधना आमटेंच "समिधा" घेतेय आणि तुमच्यासाठी "इंडिया टुडे" अजून? सौ.अभ्यंकर माझ्याकडे बघत म्हणाल्या

"सुनबाईंना कुठली तरी कादंबरी हवी होती?" मी सौं ना आठवण करुन दिली

"अग्ग बाई! हो ना." म्हणत आमच्या सौ कादंबरीच्या कपाटाकडे वळल्या आणि मी सकाळची सप्तरंग पुरवणी घेऊन जवळच्या खुर्चीत बसलो.

भवताली इतर वाचक बसले होते. त्यांची मंद स्वरात कुजबुज सुरु होती.

"अग! काय बाई त्या चार्ल्स शोभराजचं आत्मवृत्त आहे." सुंदर गोरी वाचक उत्साहाने शेजारच्या निमगोऱ्या वाचकाला म्हणाली

"अय्या! पूर्ण वाचलं का तू?" निमगोऱ्या वाचकाने उत्साहात विचारलं

"छे ग! पूर्ण काय वाचतेय. महत्वाचं ते वाचलं न." तोंडातलं हसू परत तोंडात कोंबत ते सुंदर ध्यान तिला म्हणालं

"महत्वाचं म्हणजे?" निमगोऱ्या वाचकाला तो महत्वाचा अर्थ लक्षात आला नसावा

"काय गं तू? महत्वाचं म्हणजे....त्याची लफडी....अग! कित्ती बायका.....काय काय लिहलय...त्यांच्याबद्दल" त्या सुंदर गोऱ्या वाचकानं कानात कुजाबुजत ते वाक्य संपवलं

"अग्ग बाई! म्हणजे वाचायलाच हवं. परत नको करु. मी तुझ्याकडूनच नेते." हसू आवरत निमगोरी वाचक म्हणाली

"बरं" सुंदर गोरी वाचक

"अगं! तुला पानगेच्या सुनेबद्दल माहिती न?" सुंदर गोरी वाचक विषयांतर करत म्हणाली

"काय ग?" निमगोरी वाचक

"रोज तिला घरी बॉस सोडायला येतो म्हणे." सुंदर गोरी वाचक

"अग्ग बाई, तिची सासू तर अख्या गावात शहाणपणाचे धडे देत फिरते." निमगोरी वाचक

"अहो, चला." माझं लक्ष त्या दोघींकडे बघून बॅगमध्ये पुस्तक कोंबत आमच्या सौ. करड्या आवाजात म्हणाल्या

"सुनबाईंची कादंबरी मिळाली ना?" मी सौं च्या रागाची फ्रिक्वेंसी मॅच करायची म्हणून सहज विचारले

"हो." सौ. अभ्यंकर

याचा अर्थ रागाची फ्रिक्वेंसी मिडीयम होती. आधी मंदिर नंतर भाजी घेत घरी जाईपर्यन्त निवळेल हा विचार करत मी सौं कडे कटाक्ष टाकत लायब्ररीच्या बाहेर आलो. स्टॅंडवरुन पायताण काढल्या. आमच्या मागून त्या दोघी आल्यात.

"अय्या! नवीन चपला? कुठून घेतल्या? कितीच्या घेतल्या? मला असल्याच घ्यायच्या होत्या गं." सुंदर गोरी वाचक

"सेल मधून घेतल्या....माहित नाही कितीच्या." निमगोऱ्या वाचकाच्या डोक्यात बहुतेक चार्ल्स शोभराज घुटमळत असावा.

मी त्या अतृप्त निमगोऱ्या वाचकाकडे बघत होतो. चार्ल्स शोभराजचं "ते" ऐकून ती अस्वस्थ झाली होती. आमच्या सो कॉल्ड सुखात असल्याच्या साऱ्या खुणा तिच्या देहावर दिसत होत्या. तिच्या मनातलं मात्र ठाऊक नाही. नेमकं तेच मी तिच्या डोळ्यात शोधायचा प्रयत्न करत होतो. शब्द आणि देहबोली कितीही खोटी असली तरी डोळे...ते कधीच खोटं बोलत नाही. अर्थात हा माझा अनुभव.

नेहमी सारखा आजही मनात विचार आला, मी असले अनुबंध का शोधतोय? मी का घुटमळतोय इतरांच्या आयुष्यात? त्या गोऱ्या नीमगोऱ्या कशाही का असेना? काही का बोलेना? मला काय करायचं? माझ्या माणसं वाचण्याच्या या सवयीचा मला कधी कधी राग यायचा. कदाचित विंवचेनेतून सुटण्याची ही माझी पळवाट असावी.

"अग! आज शनिवार तुला देवळात जायचं नं." स्वत:च्या प्रश्नांवर विचार करत मी सौं कडे बघत म्हणालो

"हो, चला न." सौ. माझ्या दोन पावलं पुढे होत म्हणाली

"इथेच काढ चपला." मी बाकावर बसत म्हणालो असलो तरी मनात प्रश्नांची गर्दी आवरता येत नव्हती

"आलेच." सौं बाकाखाली चपला सरकवत म्हणाली

नेमाने दर शनिवारी मारोती मंदिरात येणाऱ्या आमच्या सौं ना मी पाठमोरी बघत होतो. नातवाचं अपंगत्व स्वीकारण्यासाठी तिला मारोतीरायाच्या शक्तीची आवश्यकता भासत होती. आणि मला? मी हे सत्य सहज स्वीकारलं होतं का? नाही. शक्यच नव्हतं. नातवाचा अपघात होऊन दोन्ही पाय गेले होते. जेमतेम आठ वर्षाचं पोर ते. साधं भोळं लेकरु ते कोणत्या चुकीची शिक्षा भोगत होतं? त्या दिवसापासून मी देवळात प्रवेश केला नव्हता आणि करणार ही नव्ह्तो. सौं ची श्रद्धा तिळमात्र

ढळली नव्हती. शनिवार ते शनिवार ती शक्तीचा प्रसाद घेऊन अपंग नातवाचं प्रगतीपुस्तक लिहित होती. आणि मी मात्र स्वतःच्या दुःखाला गुंगारा देण्यासाठी इतरांच्या आयुष्यात डोकावून बघण्याचा हास्यास्पद प्रयत्न करत होतो. मला माझीच कीव आली.

सौं च्या अकरा प्रदक्षिणा होईपर्यंत मी त्या बाकावर बसून मंदिरात ये-जा करणाऱ्या भाविकांना बघत होतो. हसरे-फसवे, खरे-खोटे चेहरे देवापुढे नतमस्तक होत होते. कन्फेशन.....कळत नकळत सारे कन्फेशन करत होते का? की मागणं मागत होते.....सवयीप्रमाणे मी त्या बाकावर बसून उगाच भाविक नजरांमध्ये काहीतरी शोधत होतो.....बहुधा मी सोसत असलेल्या वेदना अजून कोणकोण सोसतय..... मी नक्की काय शोधत होतो? मला कळत नसलं तरी एक मात्र खरं की मंदिराच्या पायऱ्या उतरतांना त्या भाविक चेहऱ्यावर ते प्रश्न त्या विवंचना नव्हत्या. तरी माझा मंदिरात न जाण्याचा निश्चय पक्का होता. या शोधात मंदिराबाहेर काढलेल्या पायताणांवर माझी नजर गेली. प्रत्येक पायताणाला घालणाऱ्याचा ताण माहित असतो. तेवढा ताण सहन करत ती ताण असह्य होईपर्यंत त्या घालणाऱ्याच्या विवंचनेनेसकट त्याचं वजन पेलत असते. मग कालांतराने तोच ताण.....नवीन पायताण....तीच भुमिका....तेच प्रश्न.....त्याच विवंचना......मग त्या ईश्वरनामक शक्तीपुढे नतमस्तक झाल्यावर कशातून सुटका होते? खरच सहनसिद्धी दुणावते?

तेवढ्यात सहनसिद्ध होऊन आमच्या सौ. मला पायऱ्या उतरतांना दिसल्या. मी तिच्या पायताण घेऊन तिच्यापर्यंत गेलो.

"तुम्ही पण ना? मी येतच होते ना बाकाजवळ. लोक काय म्हणतील?" सौ.अभ्यंकर

"मी सांगेन त्यांना, मी माझ्या बायकोच्या पायताण सांभाळायला तर देवळात येतो." मी तिथूनच गाभाऱ्यात डोकावत म्हणालो

"हसतील ना ते. चला आता. भाजी घ्यायची आहे." बायको पिशवी खांद्यावर घेत म्हणाली

निघतांना मागेवळून बघितलं. मारोतीराया गदा खांद्यावर घेऊन मंद हासत माझ्याकडे रोखून बघत होता. जणू मला सांगत होता, इतर अनुबंध चाचपडू नकोस. तुझे भावबंध सांभाळायला तू सक्षम आहेस. तुला जन्मत: इतरांपेक्षा अधिक सहनसिद्धी दिली आहे. ती संपली की ये. मी इथेच उभा आहे.

# प्राक्तन

तिन्ही सांज होत आली. गारव्याची मंद झुळूक माझ्या मनाला आल्हाद देऊन गेली. वाफाळलेला चहाचा कप घेऊन मी अंगणात आले. जांभुळलेल्या संधिप्रकाशात मनातलं मळभ बऱ्यापैकी निवळलं होतं. आपला निर्णय चूक की बरोबर हे तपासून पहाण्याची वेळ केव्हाच निघून गेली होती. आता उरल्या होत्या फक्त काही आठवणी, जपलेल्या कवितांच्या ओळी आणि कायमचं एकटेपण. हो एकटीच होती मी....आयुष्याचा प्रवास सुरु केला तेव्हा अनेक जण होते....हळूहळू एकेक सोबत सुटत गेली. आयुष्यातील प्रश्नांचं ओझं घेऊन जगणं मला अपरिहार्य होतं. आज मात्र हे ओझं झिडकारुन नव्या प्रवासाला आरंभ केला होता, माझ्यासाठी फक्त माझ्यासाठी. माझीच मला नव्याने ओळख पटली होती. माझ्यातील माझेच प्रतिबिंब मी निरखून बघत होते. माझ्यात हा आवेश, हा आत्मविश्वास मलाच नवखा होता.

आजची सांज रोजसारखी उदास नव्हती. मावळीतीच्या सूर्यासोबत माझे दु:ख, व्यथा, वेदना सारे सारे काही अस्त होतांना मी बघत होते. एक क्षण सांज धरेला कवेत घ्यायला खाली वाकली असा मला भास झाला. खूप खूप वर्षांपूर्वी....लहानपणी वाचलेली बोरकरांची कविता आठवली. या ओळी माझ्यातच घुटमळत होत्या. आज उसास्यांऐवजी त्या बाहेर पडल्या :

फांदीसारखी झुकते सांज,
जांभळासारखे पिकती ढग
हवेत गारवा जड होऊन
पेंगुळपांगुळ होते जग

मी जगाकडे पाठ फिरवली की जगाने माझ्याकडे? अनेक वर्षांपासून छळणारा हा प्रश्न आज शुल्लक वाटत होता. कधी काळी माझं जग म्हणजे माझं कुटुंब, नवरा अशोक आणि मुलगा राघव. राघव कुठे असेल? कसा असेल? त्याच्या विचारानीं जीव कासावीस झाला. हळूहळू अंधाराची पावलं दारात पडू लागली आणि आठवणींचे काजवे चमचम करु लागले.

गगनभरल्या आठवणींचे गर्द झाडींत शिरती थवे
ओला काळोख आळत येतो उकत्याझाकत्या काजव्यांसवे

"कवितेच्या ओळी सुरेख आहेत. चारुलता, सतत कसला विचार करतेस?" अरुणा

"काही नाही. तेच ते उगाळत बसते. कशासाठी माहित नाही." चारुलता

"मी असेच विचारांमध्ये अडकायचे. उगाच काहीतरी शोधत बसायचे. खरं सांगू, अर्थ नाही त्यात." अरुणा

"आज आईला जाऊन पाच वर्ष झालीत." चारुलता

"मन मोकळं करुन टाक एकदा. बरं वाटेल." अरुणा

"खरचं?" चारुलता

"अगं हो! एकदा पूर्ण रिती हो आणि हा अंधार पिऊन टाक. मग या आठवणी त्रास नाही देणार." अरुणा

"मी चारुलता, वासंती आणि दिवाकर सबनीसांची चौथी मुलगी. घरात ते दोघं, मी आणि मोठ्या तीन बहिणी असे सहाजणं, वडिल रेल्वेत कारकून, जवळच्या पालिका शाळेत दहावी पर्यन्त शिक्षण, नंतर मधल्या बहिणीसोबत थेट बाराव्वी आर्ट्सची परिक्षा दिली. पास झाले. शिक्षणला इथेच पूर्णविराम लागला. खरतर गाणं शिकण्याची हौस आणि इच्छा खूप होती पण परिस्थिती नव्हती. आई-वडिलांचा संसार दहा बाय दहाच्या खोलीतला. काका आत्या त्यांचे पण तसेच. दोनवेळचं अन्न मिळवण्याची सारी धडपड आणि या धडपडीतच सारे व्यस्त होते. सणावारी - कार्यप्रसंगी भेटण्याने थोडाफार मायेचा ओलावा आमच्या नात्यांमधे होता. पण जगण्याच्या वाढत्या अपेक्षेत हळूहळू तो ही सुकत गेला. आई-वडिलांची जीवनात मुलींची लग्न व्हावीत एवढीच काय ती अपेक्षा. योग्य वयात जमेल तसे चौघींचे लग्न

लावून त्यांनी हात झटकलेत. माझ्या आईच्या जीवनाचं सार म्हणजे नवऱ्याची मर्जी, मुलींचे लग्न, त्यांची बाळंतपण, सणवार, या सगळया कर्तव्याचं ओझं वहाणं एवढंच. आईचं भावनाविश्व कोणालाच उमगलं नाही, मलाही नाही. आईने कुठलीच हौसमौज, कोणाकडून कुठलीच अपेक्षा कधीच केली नाही. सोबत असेपर्यन्त बहिणींची माया होती. लग्नानंतर तिघीही दूरच्या गावी गेल्यात आणि हळूहळू त्या नव्या संसारात रमल्या. येणं कमी झालं आणि चौघींमधला मायेचा ओलावाही. सगळ्यांच सगळं कसं चौकटीत बंदिस्त होतं. आपापल्या वाटेला आलेले भोग निमूटपणे भोगत होतं. माझा संसार चारचौघींसारखा सुरळीत सुरु होता. माझं सासर- माझा नवरा- माझा मुलगा, माझ्या आईप्रमाणे मी कर्तव्याच्या चक्रात माझें मीपण हरवतांना बघत होते. मी होते फक्त चारुलता अशोक पंडित. पंडिताची तिसरी सुन. आमची दोन दुकानं, कोण कुठलं साभाळतं हे कोणीच सांगू शकत नसे. सगळेच मिळून कारभार बघत, मिळून मिसळून रहात. सासूसासरे असे पर्यन्त भांडण-तंटा काहीच नव्हतं. ते गेले आणि अगोदर वादावादी नंतर वाटाघाटीचा कली शिरला आणि पंडीतांचा एकोपा चव्हाट्यावर आला. ज्याने त्याने भाऊबंदकीलाच पाठ फिरवली. यात जावा, नणंदा, सुना यांपैकी कोणाची मर्जी चालली नाही. नेहमीप्रमाणे पौरुषत्वाचा विजय झाला. सुरळीत चालेले संसार आता रडत फडत रखडत सुरु झाले. व्यवसाय कोणाला जमला तर कोणाला नाही. आमच्या यांना कधीच जमला नाही. अपयश कधीच बघितलं नाही त्यामुळे ते रिचवता आलं नाही. मुलगा राघव समजुतदार होता. वडिलांच तिरसट वागणं त्याला आवडत नव्हतं. दुकानाचं बस्तान नीट बसवण्यासाठी मिळालेली हक्काची जागा विकली. भाड्याच्या घरात आलो. या घराच्या दारातच सुखानं पाठ फिरवली ती कायमचीच. दुकान चाललं नाही, त्यात नोकरी न करण्याचा हट्ट आणि तिरकस स्वभाव याला जोड मिळाली व्यसनाची.

खरतर मी आजवर ज्याच्या जोरावर सगळे सहन करत होते ती म्हणजे नवऱ्याला इतर भावांसारखं पिण्याचं व्यसन नाही, अपयशला जिरवण्यासाठी अशोकने एकदाच एक पेला हाती घेतला तो ठेवण्याचं धाडस त्याने कधीच केलं नाही. त्यानंतर मी खचले ते कायमची. निराशेचा अंधार मला घेरुन होता. जगण्याची वाट सापडत नव्हती. नियतीला काय मंजूर कळत नव्हतं. मुलगा मॅट्रीक झाला आणि सरळ घर सोडून निघून गेला. हे दु:ख मला पचवता आलं नाही. जीवन अर्थशून्य झाले. साऱ्याच वाटा अंधारलेल्या, या प्रवासात चाचपडत चालतांना आयुष्य संपवण्याचा विचार अनेकदा मनात आला पण धाडस झालं नाही. इथेही मी भेकड ठरले. प्रारब्ध खेळवेल तसा खेळ चालू असतांना, खचलेल्या आणि निराशेने घेरलेल्या जीवनात आशेचा एक किरण दबक्या पावलांनी आला. तो म्हणजे तू आहेस" चारुलता

"मी? आशेचा किरण वैगरे नाही ग मी. तुझ्या उपकारांची फेड करायला मिळाली हे भाग्य माझं." अरुणा

"माझे नाही ग, सासूबाईंचे उपकार. तुझी भेट म्हणजे माझ्या हातून नकळत घडलेल्या पुण्याईचं फळ आहे की अधांरानंतर उजेड येतोच हे सिध्द करण्याचा नियतीचा प्रयत्न, ठाऊक नाही." चारुलता

"मला आजही आठवतो आहे ग तो दिवस. जसं अगदी काल परवा घडलं होतं.

मी लग्न होऊन तुमच्या समोरच्या वाड्यात, त्या जाधवांच्या कुटुंबात आले. एकुलताएक आणि उनाड मुलगा उदय, तो लग्न झाल्यावर सुधरेल या आशेत जाधवांनी माझ्यासारख्या एका गरीब आणि साध्या मुलीशी लग्न लावून दिलं. पण उदयराव सुधरले नाहीत. मी कसाबसा वर्षभर जाच सहन केला. तुम्ही तर प्रत्येक घटनेचे साक्षीदार आहात. आमची पहिली दिवाळी, त्या दिवशी उदय दारु पिऊन आला आणि मला बेदम मारलं. आळीतले तमाशा बघत राहिले पण कोणीच मदतीला धाऊन आले नाही. आजही मला तू आणि तुझ्या सासुबाईंनी माझा घट्ट पकडलेला हात आठवतो. त्यांच्या डोळयात तराळलेलं पाणी आठवतं. तुम्ही दोघींनी कशीबशी माझी सुटका केली. मी दोन दिवस तुमच्या घरी राहिले. माहेरी निरोप धाडला तिकडून कोणीच आलं नाही. आता पुढे काय? घरच्यांचा होणारा त्रागा दुर्लक्ष करुन तुम्ही दोघी मला धीर देत होत्या. आणि शेजारीपाजारी विचारपूस करतांना या आश्रमाचा पत्ता मिळाला. तुझ्यासासूबाईंनी माझी ओटी भरली, नरधमाच्या हातून सुटका झाली, आयुष्याच्या नवीन वाटेवर निघाली म्हणून. त्या क्षणी मला त्यांच खूप कौतुक वाटलं. आपण रिक्षा पकडून थेट आश्रम गाठला." अरुणा

"त्या पाचसहा दिवसात आपले बंध खूप घट्ट झाले ना. याला मैत्री म्हणायची की काय ठाऊक नाही. पण तुझ्या डोळयात समाधान बघून जो आनंद मिळाला तो शब्दात व्यक्त करता येत नव्हता गं. नंतर बरेच दिवस आपण भेटलो." चारुलता

"एवढ्या मोठ्या या नगर शहरात मला तुमचाच तर आधार होता गं. माहेरच्यांनी जगली...मेली....विचारलं देखिल नाही." अरुणा डोळे पुसत म्हणाली

"सासू-सासऱ्यांच्या पश्चात आमच्या घराचं दार झालं होतच. आम्ही वेगळे रहायला लागलो. पैशाची चणचण, रोजचं अस्थिर जगणं. अशोकच्या हातून कळत नकळत राघववर अन्याय होत होता. मी माझ्या आईसारखीच, राघववर होण्यारा अन्याय, त्याची घालमेल समजू शकले नाही. हे सारे आठवले की माझी मीच खजील होते. एकदिवस वैतागून राघव घरातून निघून गेला आणि घरातलं उरलं सुरलेलं घरपण संपल. अशोकच दारु पिणं वाढत गेलं आणि संसारातला राम वनवासाला गेला तो कायमचा. एक दिवस अशोकने दारु पिऊन धिंगाणा घातला आणि मी रस्त्यावर आले. माझ्या मदतीला कोणीच आले नाही. अरुणा, माझी ओटी रितीच राहिली. आयुष्यात पहिल्यांदा आईची खूप आठवण आली. माहेरच्या दहा बाय दहाच्या खोलीचा हिस्सा अशोकने केव्हाच विकून टाकला होता. बरच झालं माझी ही दशा बघायला दोघेही जिवंत नाहीत ते. घारातून काढलं तरी फार वाईट वाटलं नाही. कदाचित मनाने आधीच मी घर सोडलं होतं. राघव असता तर? पण या एवढ्या मोठ्या विश्वात त्याला शोधू कुठे? त्याला माझी आठवण येत नसेल? तो कुठे असेल? काय करत असेल? या प्रश्नांना घेऊन मी आयुष्याच्या अनोळखी वाटेवर निघाले. एक रात्र ओळखीच्यांकडे काढली. बहिणींना फोन लावले. एकीनेही सरळ गाडीत बस आणि निघून ये असं म्हंटलं नाही. “सगळं व्यवस्थित होईल” या शब्दांची कोरडी थाप मिळाली.

वय चाळीस आणि बाराव्वी पर्यन्त शिक्षण, नोकरी कोण देणार? या संमिश्र विचारात दाटलेल्या भावनांना कोंडत मी निघाले आणि मला तू आठवली. इतक्या वर्षांनी माझी तीच अवस्था होती. तुला भेटू का? हो – नको, माझा निर्णय होत नव्हता, पण त्या क्षणी मला तुझ्या आधाराची गरज होती. घेतलेला निर्णय चूक की

बरोबर हे पडताळून पहाण्यास धीर झाला नाही. नकळत माझे पाय "आधार" आश्रमाकडे वळले." चारुलता

"हो, तू आश्रमात आली तेव्हा नेमकी मी कामासाठी बाहेर गेले होती. तू, मी येई पर्यन्त इथेच या पायरीवर बसून वाट बघत होतीस. मला बघताच कोंडून ठेवलेल्या तुझ्या भावना उफाळून वर आल्यात आणि तुझा बांध फुटला." अरुणा

"त्या क्षणी मला राघवची खूप आठवण येत होती. काळजीनं जीव कासावीस होत होता. उगाच त्याच त्या आठवणी उगाळत होते. तू मला सावरत आपल्या खोलीत नेलं. माझ्यावर ओढवलेल्या परिस्थितीवर तुझा विश्वास बसला नाही. तू आणि मी दोघी किती तरी वेळ निशब्द होतो. मग माझा हात घट्ट पकडून म्हणालीस आपण सावरु एकमेकींना आणि आपल्यासारख्या इतरजणींना." चारुलता

"नंतर आश्रमाच्या संचालकांशी बोलून मला स्वयंपाकघरातल्या कामासाठी ठेवून घेतलं. आपल्या खोलीत रहायला जागा दिली. आश्रमातील स्वयंपाकघरात कामात मी स्वत:ल गुंतवून घेतलं होतं. खरतर मी कोण होते? काय झालं? या सारख्या प्रश्नांना तोंड न देण्याची ती माझी पळवाट होती. अरुणा, मला हे सारं कळत होतं गं. मनाच्या खोल कप्यात सगळ्या जखमा अजूनही ओल्याच आहेत." चारुलता

"अशोकला तुझा आश्रमाचा पत्ता कळला. तो एकदोनदा पैसे मागायला आला पण तू दाद दिली नाही." अरुणा

"त्याच्याकडे परत जाण्याचे मार्ग मी स्वत:च बंद केले." चारुलता

"शिवणकाम येतं" अरुणा

"हं थोडसं." चारुलता

"मग आजपासून शिवणकामाच्या वर्गाला जायचं. माझ्या कामात मदत करायची. काल एक नवी मैत्रीण संस्थेत आली आहे. तिला स्वयंपाकघरातलं कामं समजवून सांग आणि तू शिवणकाम शिकून घे." अरुणा

"हो" चारुलता

"नको या कडवट आठवणींना सारखे उगाळत बसू. तुलाच त्रास होईल." अरुणा

"विसरणं तर शक्य नाही ना." चारुलता

"राघवची खूप आठवण येते का? तुझ्या आयुष्यात तरी राघव आहे. माझ्याकडे बघ. उगाळायला मूठभर आठवणींशिवाय काहीच नाही. कोणीच नाही." अरुणा चारुलताचा हात घट्ट पकडत म्हणाली.

खरच अरुणाचा चारुलताने विचार केला नव्हता. चारुलतापेक्षा तिच्या एकटेपणाचा डोह अधिक खोल होता.

"तुझ्या - माझ्या सारख्यांना आधार देऊन हे सारं निदान विसारायचा तरी प्रयत्न करु या." अरुणा

दोघींच नातं आधी आधाराची गरज म्हणून नंतर मैत्रीचं आणि आज विश्वासाचं म्हणून अधिकच दृढ झालं. चारुलताने आठवणींच्या काजव्यांना मनाच्या खोल कप्प्यात बंद केलं. पण रोज सांज झाली की तिचा ऊर भरुन येतो. कंठ दाटून येतो. रोज मावळतीच्या सूर्यासोबत आठवणी अस्त होतात. रोज वाटतं आज मन रिकामं झालं पण;

डोळ्यांमधे जमते पाणी ; कशासाठी कळत नाही
उरभरल्या उशासाला कुठेंच वाट मिळत नाही.

आयुष्यात काही असेही बंध असतात की त्यातून तुम्ही किती निसटायचा प्रयत्न केला तरी सगळे प्रयत्न निष्फळ ठरतात मग आपण त्याला प्राक्तन म्हूून मोकळं होतो. अशोकचं काय झालंस? राघव सापडेल ना? चारुलताचं प्राक्तन काय? रोज गतआयुष्यातील उसासे उराशी कवटाळत या प्रश्नांच्या उत्तरांची ती आजही वाट बघते आहे.

# दान नाही मदत

लाड कारंजावरुन येऊन जयवंतला एक आठवडा झाला होता. बाबांचा चेहरा डोळ्यापुढून जात नव्हता. कसे असतील? काय करत असतील? आई शिवाय त्यांच जगणं ही कल्पना त्या क्षणी त्याला असह्य होत होती. आईच्या अचानक जाण्याने समस्त नाईक कुटुंब शोकाकुल होतं. आईच्या इच्छेप्रमाणे तिचे दिवस वार न करता ठराविक रक्कम लाडकारंजाच्या मठात देऊन तो नाशिकला परतला होता. बाबांना आग्रह करुनही कारंज्याहूनच ते अकोल्याला परतले.

आई ..... आठवणीने जयवंतचे डोळे भरुन आले.

"जयवंत ... हे घे चहा." शर्वरीने त्याच्या हातात कप दिला आणि ती ही टेरेसवरुन खाली बगिच्यात खेळणाऱ्या मुलांकडे बघू लागली.

"बाबांची काळजी वाटतेय न?" शर्वरी

"हो गं, बाबा एकटे कसे रहातील, कसं सगळं मॅनेज करतील हाचा प्रश्न आल्यापासून सतावतोय." जयवंत

"आणि किती हट्टी आहेत बघ ना, यायला ही तयार नाहीत नाशिकला" जयवंत

"अरे आपल्या रहात्या घरात एक ओढ असते, तिथे रुजलेल्या नात्यांना जो जिव्हाळा असतो न तो माणसाला यायला भाग पाडतो."

"आई-बाबांच सहजीवन तिथेच सुरु झालं, रुजलं, अंकुरलं, बहरलं....त्या आठवणी तो अनामिक बंध कसं सोडून येतील ते. तू थोडं समजून घे ना रे." शर्वरी

"अगं हो, मान्य मला सर्व. पण आपलाही विचार करावा न त्यांनी." जयवंत

"ही वेळ त्यांना व्यवहार कळावा अशी नाही, अर्थात थोडा काळ जाऊ दे. त्यांना स्वत:ला सावरु दे, तू ही सावर स्वत:ला" शर्वरी

आईच्या आठवणीनं जयवंत कासावीस झाला. तो चाहाच्या वाफेच्या वलयात हरवला.

आई-बाबा आणि तो, तिघांच छोटसं विश्व. तिघांनाही फिरायची हौस. बाबांनी एल.टी.सी घेऊन सगळा भारत पालथा घातला होता.

खूप धार्मिक नसले तरी देवावर श्रद्धा होती. आई फारसे सणवार करत नसे. मात्र सगळ्यांच्या मदतीला धावून जात असे. त्यांच्या कॉलनीत आई-बाबांबद्दल सर्वांनाच आदर होता. आईच्या सल्लामसलतीशिवाय शेजारील कुठल्याही घरात

कार्यक्रम ठरत नसे. सर्वांना सोबत घेऊन चालण्याचा आईचा स्वभाव. त्यालाही वाटत असे की हिला कधी कोणाचा राग येत नसेल कां? पण आई होतीच तश्शी...

आईच्या अशा अचानक जाण्याने तो खचला होता. आत्ताशा कुठे आई नातवांमध्ये रमत होती. आयुष्याची सेकंड इनिंग सुरु होताच आई गेली. बाबा ... त्यांना त्या क्षणी एकटं सोडायला नको, हे कळत असूनही नाईलाजाने तो नाशिकला परतला होता. पुढे काय करायचं ? हा तर न सुटणारा प्रश्न होता. शर्वरी म्हणते तसं थोडा वेळ जाऊ देत. मग ठरवू काय ते.

आई जाऊन महिना झाला होता. बऱ्यापैकी गाडी रुळावर आली होती. रोज रात्री बाबांशी बोलतांना दोघांना गहिवरुन येत होतं. मित्रांसारखे गप्पा मारणारे बाबा हल्ली विचारलेल्या प्रश्नांचीच उत्तरं देत होते.

जयवंत आणि शर्वरी दोघेही त्यांच्या रोजच्या आयुष्यात गुंतलेले, अधूनमधून बाबा यायचे पण आठवडाभरातच कामाचं निमित्त साधून अकोल्याला परत जात असे. असं बरेच दिवस चाललं. त्यांना नाशिकला थांबवायची हिम्मत जयवंतला कधीच झाली नाही. मुलांच्या शाळेच्या ग्रॅंडपॅरंट्स डेसाठी बाबा आले होते. या वेळेस बाबा जरा उत्साही वाटले. नातवाच्या कौतुकाने भारावलेल्या बाबांकडे जयवंत आणि शर्वरी कौतुकाने बघत होते.

"परवा निघीन म्हणतो" बाबा

"काय घाई आहे?" जयवंतने नेहमीप्रमणे विचारलं

"बाबा, आलाच आहात तर थांबा न, जयाकाकूची एकसष्ठी आहे दहा दिवसांनी, ते करुन जा." शर्वरी

"घरचाच कर्यक्रम आहे बाबा, सर्वांच्या भेटी होतील. थांबा न" त्यांना न थांबवण्याचा निशब्द करार मोडत जयवंतने आग्रह केला.

फारसे आढेवेढे न घेता बाबाही थांबले. मग काय सोहम खूष झाला, त्याची तर मज्जाच मज्जा. आता रोज आबा बस स्टॉपवर येणार या विचाराने गडी खूष झाला. रोज झोपतांना नवी गोष्ट ऐकायला मिळणार या आनंदात तर आज होमवर्क पण पटकन आटोपला होता.

जयाकाकूकडचा कार्यक्रम मस्तच झाला. बाबा आधीसारखे उत्साही वाटले. झालं आता बाबांची जायची गडबड सुरु होईल. या विचारानं जयवंत संभाषण टाळत लगबगीनं ऑफिसला निघाला. बाबांनाही कळत होतं. गालातल्या गालात हसत ते म्हणाले जया, संध्याकाळी बोलू रे. निघ आता.

"बाबा आता बरेच नॉर्मल झाले होते. आईशिवाय जगण त्यांनी स्वीकारल होतं. कधी कधी मला रागही येत असे, असं कसं हे आईशिवाय जगू शकतात? जे वास्तव होतं ते स्वीकारण्याशिवाय पर्याय ही नव्हता त्यांच्याजवळही आणि माझ्याजवळही..." जयवंत विचार करत होता

"बाबा, सोहम आज पाळणाघरात जाणार नाही." शर्वरी

"हो, हो. माहिती ग मला. मी जाईन बसस्टॉपवर त्याला घ्यायला. काळजी नको करु" बाबा

"बाबा, जेवण मायक्रोवेवमध्ये गरम करुन घ्याल. कोशिंबीर फ्रीजमध्ये आहे. दुध थंड झाल्यावर फ्रीजमध्ये ठेवाल का? प्लीज" शर्वरी

"निघ तू. उशिर होईल बँकेत पोहचायला. मी आवरतो बाकीचं" बाबा

"डब्बा आणि पाण्याची बॉटल घे ग...." बाबा

"शर्वरी, हे घे फाईन बसायचा नाहीतर." बाल्कनीतून हेल्मेट आणत बाबा म्हणाले.

"अरे हो. घाईत विसरलेच मी." शर्वरी

"आणि हो. सोहमला दुपारी सेब नाही तर केळ द्याल हं" शर्वरी

"मी येतेच सहा पर्यंत" शर्वरी

आजची संध्याकाळ तशी रोज सारखीच होती. बाबांनी तिघांसाठी मस्त आल्याचा चहा केला होता. त्यांना आमच्याशी काही बोलायचं आहे हे लक्षात आलं होतं. सोहमला टी.वी लावून दिला. तिघेही बाल्कनीत आले.

"बोला ना बाबा. तुम्हाला कालपासून काही सांगायचं आहे." जयवंत

"हो रे. तुम्हा दोघांना सांगायचं आहे. कशी सुरवात करु कळत नाहीया." बाबा.

शर्वरीला कळेचना काय सांगायच आहे बाबांना...कशा बद्दल....दुसरं लग्न?...नाही नाही...प्रॉपर्टी....ती स्वत:शीच तर्क करत होती.

"काय झालं बाबा? काही पैसे वैगरे हवे आहेत काय?" जयवंतनी काळजीन विचारलं

"नाही रे. मी तरतूद केली होती सगळी. पैसे नकोत. थोडी मदत आणि सल्ला हवा आहे." बाबा

"तुमचं या बाबतीत काय मत असेल मी बाप असून तर्क काढू शकत नाहीया रे." बाबा

"नक्की काय झालं आहे बाबा?" शर्वरीची उत्सुकता तिला स्वस्थ बसू देत नव्हती.

"अकोल्याच आपलं घर आहे ना. तिथे आदिवासी मुलांसाठी आश्रम करायचा ठरवत होतो." बाबा

"हे काय नवीन बाबा." जयवंत

"नवीन नाही रे. तुला आठवतं का? तुझी आई एका संस्थेत काही गरीब मुलांना शिकवायला जायची." बाबा

"आठवत नं." जयवंत

"त्यापैकी मोठी मुलं, बाराव्वी झालेली, त्यांची ॲडमिशन आम्ही इंजिनीअरींग, तर काही कंप्युटर इंजिनीअरींगला केली. प्रश्न येतो ते त्यांच्या रहाण्याचा. होस्टेल किंवा खासगी रुम त्यांना पडवडणार नाही रे. तुझी आई त्यांची काही सोय होते का बघत होती. ती अचानक गेली. हा प्रश्न सुटलाच नाही. मध्यंतरी मी लक्ष दिले नाही. एक दिवस गवळी काका भेटायला आले होते. आईच्या स्मृतीप्रित्यर्थ कार्यक्रम होता ज्येष्ठ नागरिक मंडळात त्याचं निमंत्रण घेऊन. सध्या ती मुलं आमच्या मंडळाच्या ऑफिसमधेच रहात आहेत." बाबा

"मी विचार केला, आपण वर एवढा मोठा हॉल आणि किचन बांधल. तू तर कधी तरी येतोस अकोल्याला. ते जर तिथे राहिलेत तर मला सोबत होईल आणि त्यांना मदत होईल." बाबा

"सगळा विचार केला आहे ना बाबा तुम्ही. ती मुलं कोण, कुठली, कशी याची शहानिशा करुन मगच ठेवा त्यांना आपल्या घरी" जयवंत

हे ऐकून बाबांना खूप आनंद झाला. त्यांनी जयवंतला मिठीच मारली.

"आज मला कसं मोकळं मोकळं वाटतय. मला कल्पना होतीच. यासाठी तू काही नाही म्हणायचा नाही." बाबा

"बाबा, चांगल काम आहे हे. नाही म्हणायचा प्रश्नच नाही. आईंची हीच इच्छा होती ना." शर्वरी

"अरे, घराचा मालक तो आहे." बाबा हसत म्हणाले

"काय बाबा. लोनसाठी आपण ते माझ्या नावावर केल होतं. ते तर केव्हाच फेडलं आपण" जयवंत

"तुमचं घर आहे ते. तुम्हाला हवं तेव्हा हवं त्या व्यक्तिला तुम्ही देऊ दान शकता." जयवंत

"अगदी आपल्या आईसारखं बोलतोस तू. एक सांगू. दान तर मी घेतलं रे तुझ्या आईकडून. गरजूंना मदत करायच्या वृत्तीचं. दान दिलं असं बोललेलं तिला आवडायचं नाही हं. मदत केली म्हण हवं तर." बाबा

मी तर आईच्या आठवणीनं फक्त व्याकूळ होतो, बाबा मात्र आईचा वसा पुढे चालवत होते.

"बाबा, फोन करुन कळवा गवळी काका आणि साने काकांना. एक तारीख निश्चित कारायला सांगा. एखादा चांगला दिवस बघून त्यांना आपल्या घरी शिफ्ट करा. तेव्हा मी ही येईन अकोल्याला. कोण? कुठली? काय शिकतात? मी एकदा भेटूनच घेतो सर्वांना." जयवंत

"बाबा, त्यांच्या जेवणाचं काय? एखादी स्वंयपाकीण बघा ना. तुमची जेवणाची सोय होईल" शर्वरी

"गच्चीवरील फुलझाडांच्या कुंड्या तिथेच राहू द्याल..........आईने लावलीत सगळी झाडं. माळीकाका पाणी घालत असतील न रोज" जयवंत

"जया, परवा निघीन म्हणतो....." बाबा

"सोहमच्या गॅदरींगला येईनच न मी परत." जयवंतचा उतरलेला चेहरा बघून बाबा लगेच म्हणाले

"बाबा, मागे अजून एक हजार लिटरची पाण्याची टाकी बसवून घ्या. आपल्या अकोल्याला पाण्याचा नेहमीचाच प्रॉब्लेम आहे. आणि हो जिन्यात ग्रिलगेटही करुन घ्या

त्या बापलेकाच संभाषण शर्वरी कौतुकानं ऐकत होती.

दान....नाही मदत.. एक मोलाची शिकवण तिला मिळाली होती.

# वृंदावन

"रेवा, माझी बॅग भर, मी उद्या सकाळी इंदापूरला जाणार आहे" अविनाश

"अरे हो, परस्पर जायच ठरवलं. निदान मला फोन तरी करायचा"

"काय म्हणाले महेश काका ?" रेवा चहाचं आधण ठेवत म्हणाली.

"तुला कसं कळलं की महेशकाकांचा फोन आला होता ते?" अविनाश

"आठ दिवस झाले तुझं फोनवर तेच बोलणं सुरु आहे."

"इंदापूरचं घर विकायचं टुमणं त्यांनीच काढलं आहे ना. कोण तो हॉटेलवाला त्याची जरा चौकशी करुन घे?" रेवा

"तुला नक्की मावशीचा फोन आला असणार" अविनाश

"तुला कसं कळलं?" रेवा

"चौकशी करुन घे म्हणजे ...हे तुझं नाही मावशीच डोकं असणार. तुला चांगल ओळखून आहे मी." अविनाश

"सोड, आपल्याकडे बाबांचा भाऊ अर्थात रमाकाका आणि आईची बहिण अर्थात मंदा मावशी हे दोन परस्पर विरोधी पक्ष आहेत. आजातागायत या दोघांच कधीच पटलं नाही." अविनाश

"एवढी मोठी वास्तू एकदम विकायची म्हणजे... मनाला पटत नाहीया" रेवा

"मग काय करु ? आई-बाबा गेल्यानंतर त्या वास्तूकडे मी हवं तेवढ लक्ष देऊ शकत नाही. आणि आपल्याला कुठे सारखं जायला जमणार आहे. या काळात एवढ्या मोठ्या घराच मेंटनन्स किती कठीण आहे माहित आहे न तुला ?" अविनाश तिला इंदापूरची जागा विकून टाकू हे पटवून देण्याचा पूरेपुर प्रयत्न करत होता.

"जो काही निर्णय घेशील तो विचार करुन घे" रेवा त्याच्यापुढे बशीत बिस्किट ठेवत म्हणाली. तिचा सूर काहीसा उदासीनच होता.

"रेवा, तुला हा व्यवहार पटत नाहीया का?" अविने कचरतच विचारलं.

"खरं सांगू का अवि...." रेवा

"ते घर म्हणजे आई-बाबांच स्वप्न होतं रे. मोठ्या कष्टान त्यांनी ते बांधल होतं. ते मोडण्याची खरंच गरज आहे का? मला ते तू आत्ताच विकावं ते ही हॉटेलवाल्याला का कोण जाणे पटत नाही रे." रेवा

"काकांनी सगळ जुळवून आणलं आहे गं ..."अविनाश

"तेच ते, त्या काकांना ते विकण्यात इतका काय इंटरेस्ट आहे मला कळत नाही. कोण तो हॉटेलवाला त्याला ही एवढी घाई का? हे ही मला कळत नाहीया." रेवा चिडून म्हणाली.

"तू जो काही व्यवहार करशील तो सावकाश आणि विचारपूर्वक कर बस एवढंच मला सांगायच आहे." रेवा

ही रेवा म्हणजे ना, एकीकडे हो म्हणते एकीकडे वागण्यातून - बोलण्यातून नकार दाखवते... घाई करायला नको हे तिच म्हणणं बरोबर आहे म्हणा.

"रेवा, महेशकाकांना एवढी घाई कां ? खरच याकडे माझे लक्ष गेलं नाही." अविनाश

"ठीक आहे उद्या जाऊन तर बघ. मग ठरवू काय करायचं ते." रेवा

हे ऐकून अविनाश रेवाकडे एकटक बघत होता. खरंच, या बायका बोलतात.. एक करतात एक...करायला लावतात एक.

इंदापूरच्या आठवणींनी अविनाशच्या मनात गर्दी केली. त्याला त्याची शाळा...मित्र....ती धमाल.....आईबाबांनी त्याचे केलेले लाड, पुरवलेले हट्ट सगळं आठवत होतं. घर, घरातील प्रत्येक वस्तू आणण्याचा निर्मळ आनंद त्यानी उपभोगला होता. घरात जेव्हा फ्रीज घेतला, तेव्हा त्याचा पाय स्वयंपाकपाकघरातून निघत नव्हता. घसा दुखेपर्यन्त बर्फ खालला होता. या आठवणीनी स्वत:शीच हसत अविनाश लहान नीरवशी  खेळू लागला. त्याच्या खोड्या बघून त्याला त्याचं बालपण आठवलं. त्याने एक नजर नीरवच्या खोलीवर टाकली. भिंतींचा रंग, खेळणी, ती खोली रेवा आणि त्यानी, दोघांनी मिळून हौसेनं सजवली होती.  त्याला अण्णा आठवले. किती हौशीनी त्यांनी त्याच्यासाठी स्टडीटेबल सुताराकडून करुन घेतला होता.  इंदापूरचं घर त्यालाही विकायची इच्छा नव्हती. नोकरीनिमित्त सतत परदेशातील चकरा, मुंबईतील त्याचा हा फ्लॅट त्यानं नुकताच घेतला होता.

इंदापूरच्या घरी वर्ष दोन वर्ष भाडेकरु ठेवून बघितलं. आलेलं भाडं, त्यातून घराचा खर्च भागत नव्हता. त्यात आधीच्या भाडेकरुंनी विजबील, घराचा टॅक्स, पाणी बील काहीच भरलं नव्हतं. त्याला त्याचाही भुर्दंड बसला होता.

एक हॉटेलवाली पार्टी घर घेण्यात इंटरेस्टेड आहे, असा एक दिवस रमाकाकांचा फोन आला. त्या क्षणी त्याला ते विकून टाकावसं वाटलं. रेवाच बोलणं ऐकून जुन्या आठवणी जाग्या झाल्या. ना बहिण ना भाऊ, आई-बाबा गेल्यावर एकट्यानं सगळं सांभाळायचं त्याला कठीण जात होतं.

उद्या इंदापूरला जाऊ आणि पटलं तर व्यवहार करुनच टाकू. अविनाशनी मनोमन ठरवलं.

विकून आलेल्या पैशांच काय करायचं? कुठे इनवेस्ट करायचे हे तो सी.ए. फडकेंना विचारुन आलाच होता.

"मंदा मावशींना फोन कर रे. त्या तुला कालपासून फोन करत आहेत." रेवा

"मला? का ग? गेल्या आठ्वड्यातच तर बोलणं झालं तिच्याशी" अविनाश

"इंदापूरच्या घराबद्दलच बोलायचं आहे त्यांना" रेवा

"हॅलो मावशी, काय ग, कशी आहेस? माझी आठवण येत होती म्हणे तुला." अविनाश

"अरे हो. बोलायचं होतं तुझ्याशी." मंदा मावशी

"माझे बच्चू, कसे आहात? परिक्षा आटोपली का?" अविनाश

"अरे हो. रॅपिड फायर सुरु झालं का तुझं? तू कसा आहेस बछड्या? मंदा मावशी

"मी मस्त ग." अविनाश

"तुला इंदापूरच्या घराबद्दल बोलायचं होतं म्हणे? बोल न." अविनाश

"अरे हो. त्याच्याबद्दलच बोलायचं होतं." मंदामावशी

"अरे, तू विकणार होतास न. रेवा सांगत होती." मंदामावशी

"अग, नुसतं बोलणं सुरु आहे. अजून व्यवहार झाला नाही गं. त्याकडे लक्ष देता येत नाही म्हणून विकायचं मनात आलं." अविनाश

"मी समजू शकते. तुझा व्यवहार नसेल झाला तर एक प्रस्ताव आहे. बघ पटलं तरच हो म्हण रे. कुठलीही बळजबरी नाही." मंदामावशी

"ए मावशे, किती आडून बोलतेस. काय ते स्पष्ट सांग न." अविनाश

"तुला विकासकाका माहिती न. यांचा मित्र रे." मंदा मावशी

"हो, माहिती आहे की. तू कामाच बोल." अविनाश

"अरे, त्यांची बदली झाली आहे इंदापूरला. त्यांना भाड्याने घर हवं आहे. रेवाकडून कळलं तू ते घरभाड्यानी देणार नाही. हे कुटुंब चांगल आहे रे. भाडं वेळेत देतील आणि इतर त्रास ही नाही होणार याची मी खात्री देते." मंदामावशी

"उद्या मी इंदापूरला जातो आहे. रात्री कळवतो. चालेल का?"अविनाश

"अरे मी त्यांना तुझा मोबाईल नंबर देते. ते मुलांच्या ॲडमिशनसाठी इंदापूरलाच गेले आहेत. तुझी भेट ही होईल. बघ. तुला योग्य वाटतं ते ठरव." मंदा

"अशी काय बघतेस माझ्याकडे रेवा." अविनाश

"तुझं बोलण झालं न या विषयावर मावशशी." अविनाश

"हो रे. तुला योग्य वाटतं ते कर. माझी कशालाच ना नाही. पण शक्य तो विकू नको रे. एकदा विचार कर. विकासकाका हे संजूकाकांचे चांगले मित्र आहे. त्या सज्जन माणसाला घर भाड्याने द्यायला हरकत नाही." रेवा

इतके वर्ष झाली आमच्या लग्नाला. हिची नाही नाही म्हणत हो म्हणण्याची स्टाईल काही औरच आहे. असं बोलून ही माझ्याकडून सगळी कामं तिला हवी तशी करुन घेते. "नको असू दे" करत घरातलं तिला हवं तसं इंटेरिअर करुन घेतलं. झेपेल का...मला जमेल का...करत मी नाही म्हणत असतांना नीरवच्या वेळेस चान्सही घेऊन घेतला. या वर्षी नको...पुढच्या वर्षी जाऊ करत केरळ ट्रीप करुन घेतली.

"मस्त विकेट घेतेस रेवा तू माझी." अविनाश

"हा मस्का आहे कि थट्टा रे" रेवा डोळे मिचाकवत म्हणाली.

"तुला जे योग्य वाटतं ते समज" अविनाशने तिला तिच्याच स्टाईल मधे सांगताच तिला लटका राग आला.

"जोक्स अपार्ट. मी इंदापूरला गेल्यावर तिथे काय ठरतं ते बघतो. आधीच्या अनुभवावरुन घर भाड्याने द्यावे की नाही समजत नाहीया रेवा." अविनाश

"जर तो हॉटलवाला चांगली किंमत देत असेल तर त्याचा विचार करु." अविनाश

---------oooo--------

"नमस्कार मी गजानन जाधव. तुम्ही अविनाश न. रमाकांतभाऊ येतीलच एवढ्यात." जाधव स्वत:ची ओळख करुन देत म्हणाले

"नमस्कार." अविनाश

"मस्त आहे घर. मोक्याच्या ठिकाणी आहे. मुख्य म्हणजे बस स्टेशन जवळ आहे." जाधव

"गरजेनुसार मला घरात बदल करुन घेता येईल. काय आहे माझं हॉटेल इथं बसस्टॅंड जवळ आहे. जुनं घर आता पुरत नाही." जाधव

"काय रेट वैगरे काही ठरवला का? सध्या या भागात २५००आहे." जाधवांनी काकाची वाट न बघता थेट विषयालाच हात घातला.

काका आल्यावर घर बघून झाले. इतर गप्पा झाल्यात. जाधव आणि रमाकाका विकण्याची खूप घाई करत होते. त्यांनी तर "पन्नास हजार देऊन टाकतो" इथपर्यंत ची घाई ठिक होती. त्यांनी तर थेट किचन मोठ करतो, मागच्या अंगणात वर शेड टाकतो, हे सगळ प्लॅनिंग ऐकून अविनाश जरा चिडलाच. त्यांची ती घाई बघून अविनाश विचार करुन कळवतो म्हणाला.

घर बघितल्या क्षणी त्याची एकेक आठवण जागी झाली. सदा बहरलेलं अंगण आज खुरटं आणि निस्तेज दिसत होतं. गाडीसाठी केलेला रॅम्प उखडला होता. फाटकाच्या कमानीवर चमेलीचा वेल सुकुन गेला होता. तेवढ्यात त्याचं लक्ष तुळशी वृंदावनाकडे गेलं. आईनी ते मोठ्या हौशेनी बांधून घेतलं होतं. त्याच्या गवाक्षात ती तुटलेली पणती दिसताच त्याला एक क्षण तुळशीपुढे रोज दिवा लावणाऱ्या आईचा भास झाला, रोज संध्याकाळी ती पणती तुळशीपुढे लावून ते दोघं "दिव्या दिव्या दिपत्कार... म्हणायचे. वृंदावनात खोचालेल्या त्या उदबत्तीचा सुगंध त्याला आजही आठवत होता. आता मात्र त्या वृंदावनात भेगाळलेली माती होती. पोर्चमधल्या बाकावर बसत त्यानी एकदा घराकडे नजर टाकली. निर्धार करत तो उठला आणि मावशीला फोन लावला.

"मावशे, विकासकाका आणि काकू अजून पोहचले नाहीत ग. विचार त्यांना किती वेळ आहे. मी येतो चौकात एक चक्कर टाकून" अविनाशनी मवशीला फोनवर विचारले

"अरे अवि, केव्हा आलास?" तेवढ्यात शेजारच्या दिघेकाकूंनी आवाज दिला

"ये रे. तुझ्या आवडीची बासुंदी खायला." दिघे काका

"काय ठरवलं रे या घराचं? जरा डागडुजी करुन घे." दिघे काकू

"काय म्हणे तुझा रमाकाका. मागे येऊन गेला या जाधवांना घेऊन. तेव्हा नेमकी तू दिलेली किल्ली मला वेळेवर सापडली नाही." दिघे काका

"मी म्हंटल होतं त्याला अरे विकाणार असता तर बोलला असता अवि आम्हाला." दिघे काकू

"विकणार नाही हो काकू भाड्यानी देतो आहे. संजू काका आहेत नं, त्यांचेच मित्र आहेत. विकास म्हात्रे. चांगले लोकं आहेत. तुम्हाला त्रास नाही होणार." अविनाश

"बरं झालं हो विकणार नाही ते. अरे रमाकाका एजन्ट साठी काम करतो. त्याला काय कमिशन मिळेल." दिघे काका

हे ऐकून अविनाश उडालाच. रमाकाका दूरचा काका असला तरी त्याचं नेहमीच येणंजाणं होतं घरी. रमाकाकानी निदान हे सांगायला हवं होतं. म्हणून तो घर विकण्याची घाई करत होता.

"काकू, उद्या माळी काकांना स्वच्छता करायला पाठवता का?" अविनाश

"आज रात्रीच निघणार होतो. आता आलोच आहे तर घराची आवश्यक ते कामं उरकून घेतो." अविनाश

"कुठे थांबणार?" दिघेकाका

"मकरंदकडे. त्याला सांगितलं आहे." अविनाश

"उद्या जेवायला ये इकडेच. गप्पा करु. रेवा आणि नीरव कसे आहेत रे?" दिघेकाकू

"हो! येतो न. रेवा आणि नीरव दोघेही मस्त आणि मजेत आहेत." अविनाश

घराची जुजबी कामं आटोपली होती. माळीकाका स्वच्छता करुन गेल्यानंतर आता त्याघराला थोडंफार घरपण आलं होतं. विकासकाका आठवड्याभरात रहायला येणार होते. वृंदावनात लावायला त्यानी नवीन तुळशीचं रोप आणलं होतं.

आई-बाबांच्या आठवणींनी समृद्ध घर, निव्वळ आपल्याला जमत नाही म्हणून आपण विकायला निघालो हा विचार येताच तो खजिल झाला. या व्यवहारी जगात उच्च रहाणीमान सांभाळायच्या नादात आपण किती मग्न होतो. चपला जोड्यांपासून ते खाण्याच्या पदार्थांपर्यंत प्रत्येक गोष्टीत स्टेट्स, कॉर्पोरेट पार्ट्या, वीकेन्डस, क्लबस ... या इंदापूरच्या रस्त्यांवरुन कधीकाळी आपण सायकलवर फिरत होतो, या समोरच्या ग्रांऊडवर अनवाणी क्रिकेट खेळलो, थोडे थोडे पैसे जमा करुन सिनेमे बघितले, आई-बाबांनी एवढं शिकवलं ज्यामुळे आज मजलदरमजल मी प्रगती करतोय. शिखरावर चढायच्या नादात मी जिथे पहिली पायरी चढलो तीच विसरलो.

आठवणींनी भारावलेल्या अविनाशने घरावर नजर फिरवली. ती वास्तू जमेल तसं जोपासायचा निर्धार केला.

# मोक्ष

रंजनाला राघवच्या बाललीलांमध्ये रमलेलं बघून सौरभ निश्चिंत झाला. खेळता खेळता राघव रंजनाच्या मांडीवर झोपला. संयुक्ताने पांघरायला एक दुपटं दिलं.

"आई, चहा ठेवते" संयुक्ताने दबक्या आवाजात विचारलं

"चहा........." सौरभ टी.व्ही. सुरु करत म्हणाला

"श्श्श......हळू बोल ना. चहाच ठेवतेय." संयुक्ता

"आई, गाण्याचा कार्यक्रम सुरु झाला, ये बघायला." सौरभ सोफ्यावर जागा करत म्हणाला

"अरे, राघाव झोपलाय.....परत लागेल तेव्हा बघू." रंजना

"खायला पण कर काही तरी." सौरभ टी.व्ही बंद करत म्हणाला

"आई, सुरळीच्या वड्या करु का?" संयुक्ता

"असं कर आधी वड्या कर मग चहा" सौरभ

"तू पण ना......" संयुक्ता

रंजनालाही कळत होतं लेक आणि सुन दोघेही शक्य तेवढा वेळ कधी राघव, कधी टि.व्ही, कधी गप्पा यात तिला गुंतवून ठेवायचा प्रयत्न करत होते. राघवच्या बाललीला, बोबडे बोल काही वेळासाठी तरी नको त्या आठवणींना गुंगारा देत असले तरी काही क्षणांसाठीच.

आधीच्या आयुष्यात म्हणजेच सौरभचं लग्न होईपर्यन्त तिला स्वत:साठी कधी वेळच मिळाला नव्हता आणि तिने काढला नव्हता. सतत भरलेलं घर, पाहूणे, नातेवाईक, सणवार. रंजना म्हणजे गृहकर्तव्यदक्ष...सुगरण...टापटीप, वेळच्या वेळेत काम......सगळं व्यवस्थित जागेवर...जिथल्या तिथे.....एक परफेक्ट गृहिणी म्हणून ती तिच्या कुटुंबात लोकप्रिय होती. तिचा नवरा सुधाकर, मुलगा सौरभ आणि मुलगी संहिता सतत तिची टिंगल करायचे. सुधाकर तिला नेहमी समजवून सांगायचा घराला....घरपण जपतांना थोडा वेळ स्वतःला दे, मैत्रीणींकडे जा, भिशीला जा. रंजना मात्र आपल्या घरकुलातच दंग असायची. "आई, तुझ्याहातची चव.......न.." "मावशी ओन्ली यू कॅन कूक इन दिस वर्ल्ड."...."आत्या परफेक्शनची डेफिनेशन म्हणजे तू", "काकू, प्लीज माझ्या आईला शिकवा ना हा पदार्थ" "अग रंजू, लग्नकार्य आहे ग. तू असलीस की मला टेन्शन येत नाही." "अहो वन्स, व्याहीभोजनाला काय बेत करु....वेगळ मेन्यु हवा आहे......" कमी तिखटाचे रुचकर पदार्थ सांगता का वहिनी......", "अग रंजूताई, नव्या घरात पूजा ठरली आहे.......काय बेत करु......मला नाही सुचत ग."

हे सगळ करता करता सुन आली, जावई आला तरी रंजनाचा पाय मात्र घरात अडकलेला.

संयुक्ता आली आणि तिच्या आयुष्यात बहरुन गेलं. घराच्या चारभिंतीपलीकडच जग तिने दाखवलं. घरची सर नसली तरी एखाद्यावेळेस बाहेरची पाणीपुरी आनंद देते. मैत्रीणींसोबत मनमोकळया गप्पांनी आयुष्यात चैतन्य येतं...... गॉसिपिंग.......म्हणजे मिळमिळीत आयुष्यावर चमचमीत फोडणी..........गॉसिपिंग ॲडस् स्पाइसेस् टू अवर लाइफ....मम्मा" ती नेहमी म्हणत असे. ती आल्यानंतरचे ते तीन वर्ष तिच्या आयुष्यातले मंतरलेले होते. बातम्या, वाचन, महिला मंडळ, भजनं, सहली. खरं तर संयुक्ता आल्यापासून ती नव्याने जगायला शिकली होती.

गेल्यावर्षी सुधाकर, आयुष्याचा जोडीदार अचानक सोडून गेला आणि रंजनाने परत स्वतःला घरकुलात कोंडून घेतलं. या दुखातून जेमतेम सावरली होती तर या अपघाताने तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. भूतकाळात रंजनाचं वारंवार घुटमळत जगणं सौरभ आणि संयुक्ताला अस्वस्थ करत असे. तिला दुःखातून सावरायचा दोघंही खूप प्रयत्न करायचे. रंजनाला ते सर्व कळत असलं तरी ती त्या दुःखापुढे अगतिक होती.

"आई ... आई उठताय न. आज रुद्र येणार आहे." संयुक्ता

"रुद्र..... हो हो... " रंजना जरा ओशाळलीच.

विचार करता करता पहाटे केव्हा तरी डोळा लागला असावा. तिचे जड झालेले डोळे संयुक्ताने हेरले असले तरी ती काय करणार होती.....दिलासा देऊन आता ती थकली होती.

सर्व आवरुन ती रुद्रची वाट बघू लागली.

रुद्र, तिचा नातू. संहिता तिच्या लाडक्या मुलीचा मुलगा. नाताळाच्या सुट्टीत दहा दिवस रहायाला येणार होता.

खरं तर खूप आनंद व्हायला हवा होता. ती ओशाळली होती. खजील झाली होती. रुद्रच्या येण्याने आईला त्रास का होतो, हे सौरभ व संयुक्ताला पडलेलं कोडच होतं. कदाचित रुद्रला बघून संहितेच्या आठवणींनी तिचा जीव कासावीस होत असावा, हा निष्कर्ष दोघांनी काढला.

"आई, संहिताची आठवण येतेय का? विसरणं शक्य नाही कळतंय मला. जे झालं ते स्वीकारण्यापलीकडे आपल्याजवळ पर्याय नाही हो." संयुक्ताने समजवण्याचा प्रयत्न केला.

"त्यात रुद्रची काय चूक. तो भोळा भाबडा जीव." संयुक्ता

"कसं सांगू तुला...रुद्रची काही चूक नाही. चूक तर ........." रंजना पुटपुटत बाल्कनीत आली.

तेवढ्यात तिला सौरभ आणि रुद्र येतांना दिसले. मामा-भाचे हातात हात घालून गप्पा करत घराकडे येत होते. मामाचा हात पकडून चाललेल्या रुद्रच्या डोळयात आनंदाची चमक होती.......विश्वास होता......याला मोठ झाल्यावर कळलं तर......आपल्यावर तेवढच प्रेम करेल तो... हा विचार येताच रंजना ओशाळली..

आज्जी....आज्जी करत ते इवलेसे हात रंजनाच्या गळयात पडले. तिला गहिवरुन आलं. मोठ्या धीराने तिने अश्रू थोपवले. रुद्रला उराशी घट्ट कवटाळले.

रुद्रचं घरभर बागडण, शाळेतल्या गमती जमती, काकाकडे केलेली धमाल, त्याच्या गप्पा, रंजना सगळ कौतूकाने बघत होती, ऐकत होती. तेवढ्यात राघवच्या रडण्याचा आवाज आला. रुद्र त्याच्याकडे पळाला.

नाश्ता आटपून सौरभ, राघव आणि रुद्र तिघे खाली गार्डनमध्ये गेले. संयुक्ता स्वयंपाकाला लागली.

रुद्रच्या येण्याने ओली जखम चिघळली होती. आठवणींच ओझं ..... तिला सहन होत नव्हतं. ओशाळलेली रंजना उठून झोपाळयावर आली. डोळे बंद करताच अंधारलेल्या विश्वात चित्रपटासारख्या घटना एकामागून एक परत परत येत होत्या. तिला यासर्वांतून मुक्त व्हायच होतं

"सुधाकर जाऊन दीड वर्ष झालं होतं. रणजीत आणि संहिता तिला पुण्याला न्यायला आले होते. खरं तर तिला जायचं नव्हतं, पण जावयाचा आग्रह मोडता आला नाही. दोघे तिला पुण्याला घेऊन आले. सकाळी दोघं ऑफिसला निघून जायचे ते रात्री परत यायचे, त्यात रुद्रला बघायला एक बाई, स्वयंपाकाला बाई, धुणेभांड्याला बाई, रंजनाला एकटेपणाचा कंटाळा आला. पंधरा दिवस झाल्यावर रंजनाने साताऱ्याला घरी परत जाण्याचा विषय काढला. जावाई व लेक ऐकेनाच. मग रंजनाने हट्ट केला. पुणे सातरा काय चार तासाचा प्रवास, रविवारी सर्वांनी साताऱ्याला जायच ठरवलं.

रुद्रला इंजेक्शनाचा हलकासा ताप होता.

"उद्या जायच आहे. रुद्रचं औषध तर घेऊन या आज." रंजना

"हो आई. उद्या जाता जाता घेऊ एखाद्या मेडिकलमधून. आता ठिक आहे तो. मी डॉक्टरला विचारलं आहे." संहिता

"अग, पण रात्री ताप वाढला तर ...." रंजना

"आई, इट्स ओके. थोडासा ताप आहे. हे नॉर्मल आहे." संहिता

"तुम्ही आजकालच्या पोरी ... अजिबात ऐकत नाही....." रंजनाचा पट्टा सुरु झाला.

"चल संहिता, पेट्रोलही भरु आणि येता येता औषधं घेऊन येऊ.' रणजीत संहिताला म्हणाला.

खर तरं संहिता थकली होती. ऑफिसमधून यायला उशिर झाला होता. त्यात साताऱ्याला जायची तयारी करायची होती. म्हणून ती बाहेर जायचं टाळत होती.

"आई, तू पण न....... आजकाल सगळीकडे मेडिकल स्टोर्स असतात. मुख्य म्हणजे गरज नाही." संहिता

"काही कामं वेळेतच करावी." रुद्रला कडेवर घेत रंजना म्हणाली.

"आई, थकले आहे ग मी आणि रणजीत सुद्धा." रंजना

"ऑफिस आणि घर सांभाळातांना या गरजेच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करुन कसं चालेल?" रंजना

"चल ग लवकर. उद्यासाठी काय काय घ्यायचं आहे ?" रणजित

"ब्रेड घेऊन घेऊ" चपला अडकवत संहिता म्हणाली

"तू हो पुढे. मोबाईल घेऊन आलीच." दार परत ढकलत संहिता म्हणाली

"काय ग, चार्जिंगला लावलाय न. राहू दे. त्यालाही विश्रांती देत जा अधे मधे" रंजना वैतागून म्हणाली

तास झाला, दोन तास झाले, रणजीत आणि संहिता परतले नव्हते. काय आजकालचे पोरं! उद्या निघायचं आहे....घरी बाळ आहे विसरलेत वाटतं. रंजना मनातल्या मनात म्हणाली.

रुद्र झोपला होता. दोघांचे मोबाईल घरीच होते. मनात शंकेची पाल चुकचुकली. तिची घालमेल सुरु झाली. चौकशी तरी कशी करायची, कुठे करायची?

थोड्यावेळाने मात्र रंजनाचा धीर सुटला. घाबरतच तिने शेजारच्या पुरंदरेची बेल वाजवली. कौशिक घरीच होता. त्याने धीर दिला. तेवढ्यात सोसायटीतील इतर लोकं त्या मजल्यावर जमा झाले. काय करायचं? ही चर्चा सुरु असतानाच पोलिसांची गाडी आली, रणजीत घाडगे....पत्ता विचारत शोधत वर आले. रणजीतच्या गाडीला अपघात झाला होता. अपघात होऊन तास दिड तास झाला होता. हे ऐकून रंजना घाबरली. भवताल काय घडतय रंजनाला काहीच कळत नव्हतं. ती सुन्न झाली होती. तो सायरन .... रुद्रच रडणं .....तो गोंधळ. कौशिकने रणजितच्या मोबाईलवरुन काही नातेवाईक आणि मित्रांना कळवलं. काही थेट दवाखान्यात गेले तर काही घरी आलेत. घरात शहरातले नातेवाईक आणि मित्र जमा झाले होते. चर्चा ... आणि विविध तर्क जो तो काढत होता.

या घाईगडबडीत तिने सौरभला फोन केला. कौशिकने त्याला कळवलं होतं. तो गाडी करुन निघाला होता. तेवढ्यात संयुक्ताचा भाऊ समीर आणि वडिल दवाखान्यातून आले. त्यांचे गंभीर चेहरे बघून रंजनाच्या छातीत धस्स झालं. काहितरी भयंकर घडल्याची जाणीव तिला मघापासून अस्वस्थ करत होती. मनातल्या मनात देवाचा धावा सुरु होता. कितीतरी नवस अजाणता ती बोलून गेली होती. दोघेही सुखरुप असू दे अशी देवाला विनवणी करुन तिने डोळे घट्ट मिटले. समीरने मोठ्या धीराने त्यांना ते खूप सिरयस आहेत. डॉक्टर प्रयत्न करत आहेत, काळजी नका करु.......सांगत होता. खरं सांगण्याचा त्याचा काय कोणाचाच धीर होईना. रणजितचे आई-वडिल, जावाई बहिण पोहचले. भाऊ बॅंगलोरवरुन निघाला होता. एका क्षणात होत्याचं नव्हतं झालं होतं. सर्वांवर दुखा:चा डोंगर कोसळला होता.

रुद्रला छातीशी कवटाळून रंजना स्वत:ला दोष देत होती. काय गरज होती औषधसाठी हट्ट करायची? साताऱ्याला जाता जाता घेता आलं असतं. खरच स्वत:चा हट्ट आठवून ती रडत होती. हे ओझं, ना तिला सांगता येत होतं ना पेलवत होतं.

रुद्रला रणजीतचा आई-वडिल आणि भाऊ आपल्या सोबत घेऊन गेले. दर वर्षी रुद्र सुट्ट्यांमध्ये आपल्या मामाकडे रहायला येतो आणि रंजनाची खपलीने भरलेली जखम चिघळते. परत तोच पश्चाताप......ज्याला प्रायश्चित्त नाही.. आणि हे असच सुरु रहाणार होतं.

आज रुद्रला बघून ओली जखम चिघळली. काय चूक होती त्या निष्पाप जीवांची. काय गरज होती मला त्यांना बाहेर पाठवायची. हे दडपण घेऊन आता उरलेलं आयुष्य तिला जगायचं होतं. देह मुक्त झाल्यावर या दु:खातून तिला मोक्ष मिळणार होता.

डोळे गच्च मिटून ती मोक्षासाठी देवाला मनातल्या मनात याचना करत होती.

जया चक्षुने लक्षिता लक्षवेना।
भवा भक्षिता रक्षिता रक्षवेना॥
क्षयातीत जो अक्षयी मोक्ष देतो।
दयादक्ष तो साक्षिने पक्ष घेतो॥

# सदानंद

"येऊ का?" आनंद फाटक उघडून आत येत म्हणाला

"या या." रजनी फुलांची टोपली व्हरांड्यातील बाकावर ठेवत म्हणाली

"काय म्हणताय? तुम्ही आज सकाळी योगा क्लासला आल्या नाहीत. मी तुम्हाला मेसेज केला होता व्हॉट्स ऐपवर." आनंद

"अं..हो. मोबाईल वापरायला अजून मला व्यवस्थित जमत नाही. आलेले मेसेज फक्त वाचते मी." रजनी ओशाळली

"अरे! माझीही हीच गत होती. गेल्या महिन्यात वाढदिवसाला जावई आणि लेकीनं गिफ्ट केलाय मला हा स्मार्ट फोन." आनंद हसत म्हणाला

"हळू हळू शिकतेय मी पण." रजनी

"तसं सोप्प असतयं हो." आनंद

"हो प्रयत्न करतेय. पण नेमका कसं वापरायचा ते कळत नाहीया." रजनी

"तुमची हरकत नसेल तर मी शिकवू का?" आनंद

"अं...चालेल ना. उद्या वर्गावर आले की शिकवा." रजनी

"बरं. तुम्ही म्हणाल तसं. येतो मी." आनंद उठत म्हणाला

"बरंय़" रजनी मनोमन खजील झाली.

न चहा न पाणी, काही विचारलं तर नाहीच उलट अप्रत्यक्षपणे त्यांना जायलाच सांगितलं. पाठमोऱ्या आनंदला बघताच तिच्या मनात विचार आला.

खरं तर जयंत नसतांना असं परकं माणूस येणं, हे तिला नवीन होतं. त्यांच्याशी कसं वागावं, बोलावं हेच तिला सुचत नव्हतं. दिर, भाऊ, जयंताचे मित्र यांच्याशी जितक्या सहजतेनी बोलायची तितका सहज संवाद तिला आनंदशी साधता येत नव्हता. आपलं वय काय? आणि घरात एकटं असतांना असं परपुरूषाशी बोलणं म्हणजे? लोक काय म्हणतील? आणि जयंता... त्यांना काय वाटेल? हा विचार मनात येताच ती घरात आली. जयंताच्या फोटोला मनोमन नमस्कार केला आणि खजील झालेली रजनी बंगईवर जाऊन बसली आणि डोळे गच्च मिटले. बंगईचा मंद झोका तिच्या आठवणी जागवत होता आणि मन, ते त्या आठवणी झटकायचा प्रयत्न करत होतं. त्या क्षणी तिला काहीच नको होतं....आठवणी....संवाद....सोबत...काही म्हणजे काहीच नाही. तिला वाटलं काही क्षण असंच तिमिराला वेढून घ्यावं आणि यात हरवून जाव्यात आपल्या व्यथा,

कोंडमारा, हा एकाकीपण आणि रिक्त होऊन पुन्हा नव्याने आयुष्य सुरू व्हाव. पण असं होतयं का कधी? तिमिरासोबत बळेच आठवणींनी तिला वेढलं.

चार चौघांसारखाच बहरलेला तिचा संसार. नीरव, तिचा आणि जयंताचा एकूलता एक आणि अत्यंत हुशार मुलगा. जयंता, सरकारी खात्यात अधिकारी होता. त्यांची शेवटची बदली कोल्हापूरला झाली होती. तो भाग खूप आवडला म्हणून तिथेच छोटसं घरकुल बांधलं आणि नीरवला पुढच्या शिक्षणासाठी परदेशी पाठवलं. साधी देवभोळी माणसं. आपण बरं आणि आपलं काम बरं. कोणात उगीच गुंतायचं नाही, जयंतांच्या वारंवार होण्याऱ्या बदल्यांमधून तिने हा धडा घेतला होता. दर तीन-चार वर्षांनी नव्या जागेत बिऱ्हाड थाटायचं, आणि मग ती जागा सोडून जातांना फार त्रास व्हायला लागला. मग तिने ठरवलं की त्रास होईल एवढं कोणात कधी गुंतायचं नाही. ही सवय हळुहळु तिच्या स्वभावाचा भाग कधी झाली हे तिला कळलच नाही.

सगळं सुख दाराशी असतांना एक दिवस अचानक अपघात होऊन जयंता तिला अर्ध्यावाटेवर सोडून निघून गेला. जयंताशिवाय जगणं तिला असह्य होत होतं. नातेवाईक, मैत्रीणी, शेजारी, सगळे आले, सांत्वन केलं आणि निघून गेले. नीरव परदेशी निघून गेला. जेमतेम वयाची साठी गाठली होती तिने. ना नोकरीचं वय, ना व्यवसाय करण्याचं. त्यात खूप लोकांमध्ये रमणे हा तिचा स्वभाव नव्हताच. खरं तर तिच्यासाठी खूप कठीण काळ होता. आयुष्यात एकाएकी निर्माण झालेली पोकळी, यात तिचा जीव गुदमरत होता. आता उरली होती फक्त ती आणि आठवणी. चारचौंघीसारखे तिचे भजनात मन रमेना. एकटं रहाणे जमेना. मग वाचनात तिने स्वतःला गुंतवलं. टिव्हीत मन रमवण्याचा प्रयत्न करू लागली. हळूहळू काळ पुढे

सरकत होता, दुःखातून बाहेर पडून तर कधी कधी दुःखासकट ती सहज वावरायला शिकत होती.

"काय आज अंधारतच बसल्यात? दिवाबत्ती पण केली नाही वाटतं?" सुनंदानी आल्या आल्या घरातले दिवे लावत विचारलं

"अगं! लावतच होते मी." रजनी

"आज संध्याकाळी फिरायला पण दांडी मारली वाटतं?" सुनंदा स्वयंपाकघरात ओट्यावर सकाळचं काय शिल्लक आहे ते बघत म्हणाली

"नीरवचा फोन येणार म्हणून वाट बघत बसले." रजनीनी परत मोबाईल चेक केला.

"चहा ठेवू का थोडासा?" सुनंदा

"हो, बेल वाजतेय. आधी बघ जरा कोण आहे ते." रजनी

"बघते" सुनंदा

"ये शारदा" रजनी

"अगं, शांता शेळकेंच्या कवितांवर तू लिहिणार होतीस ना?" शारदा

"झालंय. फेयर करून देते उद्या." रजनी

रजनी आणि शारदाच्या काय? कसं? हे-ते, इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. शारदा कार्यक्रमाचं आमंत्रण घेऊन आली होती. त्यांच्या कॉलनीत साठीच्या आणि साठीपलीकडच्या सदस्यांचा नुकताच एक गृप सुरु झाला होता. कॉलनीत मधोमध असलेल्या छोट्याशा गार्डनमध्ये त्यांचे कार्यक्रम होत होते. योगा, हास्य क्लब, आणि इतर कार्यक्रमानिमित्त सगळे भेटत होते. शेजारच्या गौरीताईंच्या आग्रहामुळे रजनी या गृपमध्ये जाऊ लागली. कॉलनीतील हरहुन्नरी कामतकाकांनी त्यांचा एक व्हॉट्स ऐप गृप तयार केला. त्या ग्रुपवर मेसेजचा भडीमार असायचा. शारदानी एक दिवस रजनीची कविता ग्रुपवर टाकली आणि सगळ्यांनी भरभरून दाद दिली. रजनीचा हुरुप वाढला आणि हल्ली वरचेवर कविता लिहू लागली, शारदा त्या कवितांचे फोटो काढून ग्रुपवर पोस्ट करू लागली. कविता करणे तिचा विरंगुळा नव्हता तर एकटेपणावर मात करण्याचे निमित्त होते.

"रजनी, महिना अखेरच्या कार्यक्रमात तू एखादी कविता म्हणावी असं मला वाटतं. किती छान लिहितेस तू." शारदा

"लिहण्यापर्यंतच मजल माझी. ते ही अलिकडेच लिहायला घेतले. सादरीकरण नको ग." रजनी

"आपलीच तर लोकं आहेत सगळी." शारदाताईचा आग्रह सुरुच होता

"बरं. प्रयत्न करते." रजनीनी आढेवेढे घेत हो म्हंटलं.

"आवाज पण छान आहे तुमचा. मस्तच होईल बघा" सुनंदा

"सुनंदा! तू पण ना." रजनी

"मग! तुम्ही गुणगुणत असता गाणी आणि कविता. ऐकते की मी." सुनंदा

"बरं, आता मेसेज टाइप करायला जमतय ना." शारदा फोन हातात घेत म्हणाली

"हो ग. पण भिती वाटते. काही भलतच पोस्ट झालं तर?" रजनी

"नाही होत ग. खूप सोप्प आहे." शारदा

"बरं" रजनी

"उद्या सकाळी भेटू योगाला." शारदा

योगा क्लास आटपून रजनी निघाली आणि तिने चोरट्या नजरेने आनंदकडे बघितलं. त्याला गप्पांमध्ये रंगलेला बघून ती घराकडे निघाली. डोक्यात एकच विचार सुरू होता, आनंदला कसं सामोरं जायचं?

"अरे आपण मोबाईलचा वापर शिकणार होतो न?" आनंदनी तिला थोड्या अंतरावर गाठलच

"अं..हो ना." रजनी

"तुम्हाला आज नसेल इच्छा तर असू देत. पुन्हा कधी तरी." आनंदनी तिची घालमेल हेरली होती

"नाही...नाही. तसं नाही हो...." रजनी आजूबाजूला बघत म्हणाली

"मी समजू शकतो. मी या अवस्थेतून गेलो आहे." आनंद

"अं...सॉरी म्हणजे....." रजनी

"सॉरी कशाला? " आनंद

"नाही हो. म्हणजे ....." रजनी

"तसं बघितलं तर आपण समदुखी आहोत." आनंद

"हो ना." रजनी

"आठवणीत जगणं देखील कठीण असतंय हो." आनंद

"कितीही ठरवलं तरी आठवणी पाठ सोडत नाही, आणि त्यांच्यासोबत जगू शकत नाही. म्हणूनच आपण अस्वस्थ असतो." रजनी

"संवाद....तोच मार्ग आहे आपल्याकडे." आनंद

"कोणाशी? या प्रश्नाने मला सुरवातीला खूप त्रस्त केले." रजनी

"हो, प्रत्येकाशी बोलता येत नाही." आनंद

"आणि न बोलता जगता येत नाही." रजनी

"विचित्र अवस्था असते. आणि ही अवस्था समदुःखीच समजू शकतो." आनंद

"हो. तेही खरंच म्हणा!" रजनी स्लिंग बॅगमधून फोन काढत म्हणाली

"असो." आनंद

"हा बघा नीरवनी दिलेला फोन." रजनी

"अरे व्वा! सॅमसंगचा आहे, लेटेस्ट आहे." आनंद मोबाइल बघत म्हणाला

"हो नीरव, माझ्या मुलाने घेऊन दिला." रजनी

"तुम्हाला काय काय जमत याच्यात?" आनंद

"फोन करता येतो. मुलाला व्हॉट्स ऐप कॉल करते. टाइपिंगची भिती वाटते. इतके छोटे छोटे बटन आहेत. काही भलतच टाइप व्हायचं." रजनी एका दमात म्हणाली

"कठीण नाही फार. जमेल तुम्हाला. इथे बसू या का?" आनंद रस्त्याच्या कडेच्या बाकाकडे बोट दाखवत म्हणाला

"अं हो..." रजनीनी आजूबाजूला बघितलं आणि बाकावर अंतर ठेवून बसली

"कळतोय मला...तुमचा प्रॉब्लेम हो." आनंद

"टाइपिंगचा एक प्रॉब्लेम आणि ते फोटो वैगरे पण पाठवता येत नाही मला." रजनी कापऱ्या आवाजात म्हणाली

"नाही नाही. ते नव्हे. माझ्याशी बोलतांना तुम्ही सहजपणे बोलत नाही हे लक्षात आलं मला. पण खरं सांगू का? तुम्ही निसंकोच्च बोला हो." आनंदनी तिच्या आवाजातला कंप हेरला होता

"तसं नाही म्हणजे.." रजनी

"धकाधकीच्या आयुष्यात आपल्यासाठी कोणालाच वेळ नाही हो.." आनंद

"हो ना. कोणालाच वेळ नाही." रजनी

"ही गेली आणि माझ्या आयुष्यातला संवादच हरवला. साधना, माझ्या पत्नीचं नाव. जीवापाड प्रेम करतो मी तिच्यावर. तिनं माझं जीवन तृप्त, सुखी आणि समृद्ध केलं. कॅन्सर झाला होता तिला. वर्षभारापूर्वी मला एकट्याला सोडून निघून गेली. खरंच सोप्प नसतं असं जगणं. मला कळते तुमच्या मनाची घालमेल. अणि खरं सांगू मलाच कळू शकते." आनंद

"जयंता, भारदस्त आणि रुबाबदार व्यक्तिमत्व. त्याच्यासोबत घालवलेला आयुष्याचा प्रत्येक क्षण आनंदात गेला आगदी दुःखातसुद्धा, तो सोबत असला की

दुःख असून नसल्यासारखं वाटायचं मला. ते म्हणतात ना फुल ऑफ लाइफ होता तो." रजनी

"आपलं प्राक्तन अजून काय!" आनंद

"हो ना. कधी वाटतं असं आठवणीतच जगावं." रजनी

"हो. मात्र आठवणींनी काळीज पिळवटून निघतं कधी कधी. मग असं वाटत रिक्त होता येईल का कधी?’ आनंद‘

समदुःखी...हो दोघेही समदुःखी होते. दुःख ओठावर आलं आणि संवादात आपसूक सहजता आली.

"हे बघा. ही गॅलरी. यात फोटो सेव्ह असतात. ही शेअरची बटन, ही डिलीटची. तुम्हाला जे पाठवायचे असेल त्याच्या खाली हे शेअरचे बटन दाबले की हे आयकॉन्स येतात. हा व्हॉट्स ऐपचा आयकॉन. आणि ज्याला पाठवायचे त्याला सिलेक्ट केले की हे सेन्ड करायचं. सोप्प आहे ना. एकदा करुन बघा." आनंद

"बाप रे!" रजनी

"फार फार तर चुकेल. प्रयत्न तर करा." आनंद

"बघा. जमलं की नाही! सरावासाठी मला काही फोटो पाठवले तरी चालेल." आनंद

"मी एखादी पोस्ट आवडली की तेवढी फॉरवर्ड करते. आता हे करून बघते." रजनी

"बरंय. येतो. उद्या भेटू." रजनीचं घर येताच आनंद म्हणाला

"घरी या. चहा घेऊ या. सुनंदा येईलच एवढ्यात." रजनी

"सुनंदा?" आनंद

"आपल्या कॉलनीत बऱ्याच घरी काम करते. एकटीच आहे बिच्चारी. ती आधीच्या वॉचमनची बायको आहे. तो हिला सोडून निघून गेला. आता माझ्याजवळ राहते. मला तिची आणि तिला माझी सोबत. सगळी कामं करते ती." रजनी

"ओके." आनंद

"मध्यंतरी माझा घरी अपघात झाला होता. बाथरूममध्ये पाय घसरून पडले. उजवा हात मोडला तो कायमचा. तसा बरा आहे पण जड उचलता येत नाही आणि कामं करायला त्रास होतो. म्हणूनच मी योगा क्लासमध्ये प्राणायाम करून फिरायला निघून जाते." रजनीनी आनंदच्या चेहऱ्यावरील प्रश्नार्थक भाव हेरले होते.

"अच्छा. काळजी घ्या हो." आनंद

"बघा, आलीच सुनंदा. चहा ठेव ग" रजनी

"हो" सुनंदा

"तुम्हाला टाइपिंगला त्रास होतो म्हणालात ना तुम्ही?" आनंद

"हो ना. किती बारीक अक्षरं आहेत ती. प्रयत्न केला पण खूप वेळ लागतो हो. त्यात माझा हा हात असा." रजनी

"अरेच्चा, बोलून टाइप करता येतं की. मी नातवाला विचारतो आणि उद्या तुमच्या मोबाइलमध्ये ती सोय करून देतो." आनंद

"म्हणजे मी बोलले ते टाइप होईल?" रजनी

"हो. जे बोलाल ते टाइप होईल." आनंद

चहा घेत दोघांच्या बऱ्याच गप्पा झाल्यात. गप्पांच्या ओघात दोघांची मनं मोकळी झालीत. निघतांना आनंदच्या चेहऱ्यावर समाधान होतं. रजनीची तिच अवस्था होती. आपण उगाचच बाऊ करत होतो. आनंदला भेटून जयंतालाही आनंद

झाला असता. या विचारात ती जयंताच्या फोटोजवळ आली. मनावरचं ओझं उतरल्यासारखं तिला वाटलं. स्वतःला सावरत तिने नीरवला फोन लावला.

काय मग आजचा दिवस कसा गेला? सुनंदाने जेवणात काय बनवलं. फोनवर नवीन काय शिकली? प्रश्नोत्तरची देवाण घेवाण झाली. बोलण्याच्या ओघात रजनीने आनंदबद्दल सांगितले.

"आनंद फडके? मी असतांना होते ते काका?" नीरव

"हो. तू भेटलाय त्यांना एक दोन दा." रजनी

"आठवत नाहीया." नीरव

"ते त्यांच्या मुलीकडे राहायला आलेत. ती प्रज्ञा आहे ना तिचे वडिल." रजनी

"ओके. प्रज्ञा ताईचे बाबा. आलं लक्षात." नीरव

"काळजी घे रे." रजनी

"आई, त्यांच्याकडून शिकून घे मोबाइलबद्दल." नीरव

"हो रे" रजनी

"आणि मला आठवणीने आपल्या गार्डनचे फोटो पाठव. " नीरव

"पाठवते. आठवणीने पाठवते. आता ठेवू फोन." रजनी

बऱ्याच दिवसांनी रजनीला छान झोप लागली. हरवलेल्या संवादाचा सूर तिला सापडला होता. हल्ली सकाळी उठल्यावर चहा घेतांना व्हॉट्स ग्रुपवर तिने दिनविशेष टाकायला सुरवात केली होती.

"बरं झालं तुम्ही ते दिन विशेष टाकता. माझ्या लेकीला आज चतुर्थीचा उपवास लक्षात नव्हता. तुमच्यामुळे कळलं." आनंद

"हे एक बरं झालं. कोणाला तरी फायदा झाला. एक विचारू का?" रजनी

"बोला ना" आनंद

"ते यू ट्यूबवर गाणी कशी डाउन्लोड करायची?" रजनी

"क्लास झाला की सांगतो." आनंद

"चालेल." रजनी

योगा क्लासवरुन येतांना आनंद आणि रजनी रस्त्याच्या कडेला बाकावर बसलेत. रजनीने स्लिंग बॅगमधून कागद काढलेत. चश्मा लावून त्यावर ओझरती नजर टाकली आणि दुमडून ठेवले.

"हे काय?" आनंदनी बघताच विचारले.

"शारदाला द्यायचे आहे. शांता शेळकेंच्या कवितेवर थोडंसं लिहिलय." रजनी

"अरे व्वा." आनंद

"आज मंडळात वाचल्यावर फोन करते मी." रजनीच्या हातून कागद घेत शारदा म्हणाली

"लिहिलं तर आहे. आवडेल का माहित नाही बाई." रजनी

"न आवडायला काय झालं? तुमच्या क्लासचा आज काय विषय आहे?" शारदा

"आज यू ट्यूब डाउनलोडचा क्लास घेतोय." आनंदनी हसत विचारले

"व्वा! आमचा विद्यार्थी तुमच्या हवाली केला. नीरवनी फोन देऊन खरं तर खूप दिवस झालेत. मला वेळच मिळत नव्हता यासाठी." शारदा

"मेसेज टाइप करायला हिनेच शिकवलं मला." रजनी

"आनंद दादा आता तुम्ही सगळी फंक्शन शिकवा हिला. मी आपली वेळ मिळेल तसं शिकवत होती." शारदा

"हो. मग शिकवणी सुरू आहे आमची." आनंद

"येऊ मी? माझ्या ट्यूशनची पण वेळ झाली. मुलं आले असतील घरी." शारदा

"बरं निघ." रजनी

"आता दाखवा तुमचा फोन." आनंद

"हे घ्या." रजनी

"आधी हे नेटचं कनेक्शन ऑन करायचे. मग हा लाल यु ट्यूबचा आयकॉन आहे. यात हे भिंग आहे ना, या पट्टीवर तुम्हाला कोणती गाणी ऐकायची आहेत ते टाइप करायचे. काय लिहू?" आनंद

"लता मंगेशकर" रजनी

"हे बघा! ही लताजींची अभंगवाणी. आता हे खाली दाखवणारा ॲरो आहे ना हे प्रेस केले की डाऊनलोड होतं. आणि यावर समजा एक आडवी रेघ असेल तर मात्र गाणी ऑनलाइन ऐकावी लागतात." आनंद

"ओके."

"आणि डाऊनलोड केलेली गाणी ऐकायची असतील तर काय करायचे सांगतो. हे लायब्ररी लिहिले आहे ना, त्या वर क्लिक करा. ओके. हे बघा हे हिस्टरीच्या खाली डाऊनलोड लिहिले आहे. यात सर्व सापडेल तुम्हाला." आनंद

"कळलंय....एकदा मी करून बघू." रजनी

"बघा जमलं ना. मी म्हंटलं होतं ना, जमेल म्हणून. आता मनात येईल तेव्हा गाणी ऐकता येईल तुम्हाला." आनंद

"धन्यवाद." रजनी

"हे धन्यवाद चहाच्या रूपात असतील तर...." आनंद

"चला मग. आज मी चहा करते." रजनी

"आणि ते बोलून टाइप करायचं सांगणार होता.." रजनी

"अरे हो. उद्या नातवाला विचारतो. काल विचारायचं विसरलो." आनंद

"घाई नाही. उद्या ते शिकू." रजनी

"मी सकाळचा चहा इथेच बागेत घेते." रजनी

"इथेच घेऊ या ना मग." आनंद

"आलेच मी." रजनी

"तोवर मी पेपर वाचतो." आनंद

"हे घ्या चहा." रजनी

"छान आहे तुमची बाग." आनंद चहा बिस्किट घेत म्हणाला

"जयंता आणि मला, आम्हा दोघांना बागकामाची आवड. आमच्या प्रत्येक क्वार्टरला मोठ्ठ अंगण होतं." रजनी

"मी कधीच लक्ष दिलं नाही घराच्या बागेकडे. साधनाला होती बागकामाची आवड." आनंद

बराच वेळ दोघेही निशब्द होते. आठवणींचे गहिवर दोघांच्या मनात दाटून आले होते. आनंदचा फोन वाजला आणि दोघं भानावर आलेत.

"भेटू उद्या." आनंद

"हो." रजनी

योगा क्लास आटोपला. सगळे आपआपल्या घरी जायला निघाले. रोजसारखे शारदा, रजनी आणि आनंद शेवटी निघाले.

"मग आज काय शिकणार?" शारदा

"आज ते मला बोलून टाइप कसे करायचे ते शिकवणार आहेत." रजनी

"अरे व्वा. मग तर तुला लिहायला सोप्पे होईल." शारदा

"हो ना. आता शिकून घेते." रजनी हसत म्हणाली

"चला. मी निघते. तुमचा क्लास होऊन जाऊ दे." शारदा

"हो. नातवाकडून शिकून आलो मी. आता यांना शिकवतो." आनंद बाकावर बसत म्हणाला

"हे घ्या मोबाइल." रजनी बाकावर बसत आनंदला मोबाइल देत म्हणाली

"ही सोय तुमच्या मोबाइलमध्ये आहे हो. फक्त सेटिंगमध्ये जाऊन बदल करायचे. आणि की पॅड बदलला की झाले." आनंद

"हे बघा. मराठीत टाइप करायचं असेल तर हा की पॅड बदलायचा. नंतर हा माइकचा आयकॉन आहे ना, याला प्रेस करून बोलायचं. हे बघा इथे." आनंद

"हो दिसला." रजनी

"आलं लक्षात! हे बघा स्पिक नाओ आलं की बोलायच." आनंद

"ओके. आलं लक्षात." रजनी

"अरे. ओकेच टाइप झालं." आनंद

"हो. आधी बोलून टाइप होऊ देत. नंतर तुमचे चिन्ह, स्पेस इतर लेखन सोपस्कार करा." आनंद

"हो बरोबर आहे." रजनी

"कविता म्हणा एखादी." आनंद

"मौनाच्या भिंतीवर आदळून......शब्द जेव्हा माघारी आले, लेखणी सरसावून पुढे आली" रजनी

"छान असतात तुमच्या कविता." आनंद

"सुचलं ते लिहिते हो. विरंगुळा अजून काय! हे बोलून टाइप करायचं काम छान झालं हं." रजनी

"पाठवा मग कविता पूर्ण करून." आनंद

"हो नक्की पाठवते." रजनी

"येऊ मी. आज नातवासोबत बाहेर जायचं आहे. उद्या बोलू." आनंद

"अरे वा! जाऊन या. मी मेसेज करते न." रजनी

"बेस्ट. हो ते पु.ल देशापांडेचं पण काहितरी पोस्ट पाठवणार होत्या न तुम्ही." आनंद

"हो. माझ्या भाचीने त्यांच्यावर लिहिले आहे. तो लेख पाठवते." रजनी

योगा क्लास ते घर फार फार तर दहा मिनिटांच अंतर. त्यात दोघांच्या अधे मधे अर्धा तास तर कधी तासभर गप्पा आण मोबाइल शिकवणीचा वर्ग, गप्पांच्या ओघात रजनी आणि आनंदची मैत्री बहरत होती. स्मार्ट फोन वापरून हल्ली रजनी पण थोडी स्मार्ट झाली होती.

"आज काय लिहिलय?" आनंद बाकावर बसत म्हणाला

"शब्दांना गोंजारत एकेक रचतांना,
बोटांना काळाचे भान उरले नाही" रजनी

"व्वा! छानच लिहिले आहे." आनंद

"लिहायला घेतले आणि वेळ कसा पुढे गेला कळलं नाही." रजनी

"मध्यंतरी काळाची गती कमी झाली की काय वाटत होतं. घड्याळाचे काटे नेहमीपेक्षा हळू फिरताहेत असंच वाटायच." आनंद

"घड्याळाच्या काट्यांच माहित नाही. काळासोबत धावतांना आपली फरफट होते असंच वाटतं होतं मला तर." रजनी

"इतक्या वर्षांचा सहवास असतो. त्या सहवासाशिवाय जगायचं म्हणजे अंगावर काटा येतो...आणि..." आनंद डोळे मिटत म्हणाला

"त्यांच्याशिवाय जगायची सवय महिना दोन महिन्यात होणार काय? आणि हे असं दुःख आहे जे भोगल्याशिवाय कळत नाही हो." रजनी

"आपलंच दुःख आपल्याला कसं सोसायच हे उमगण्यात वर्ष गेलं माझं. पण खरं सांगू का? अजूनही कळलच नाही मला. साधनाची आठवणा आल्याशिवाय एकही क्षण पुढे सरकत नाही." आनंदचे डोळे पाणावले होते

"माझंही तेच. पावलो पावली जयंताच्या आठवणी दाटून येतात. जीव कासावीस होतो." रजनी

"मग मी विचार करतो आपण असे व्याकुळ दुःखी कष्टी झालेलं साधनाला आवडणार नाही. तेच टॉनिक आहे माझं, इतर डायबिटीज, बी.पी. यांच्या गोळ्यासोबत मी ते रोज घेतो आणि दिवसाची सुरवात करतो. तुम्ही करून बघा." आनंद

"मीही घेते हे टॉनिक." रजनी

"मोबाइलवर फॉन्ट मोठा करून वाचता येतं लक्षात आहे न." आनंद

"हो आहे न" रजनी

"काय झालं? तुमचे डोळे पाणावले आहेत." आनंद

"काही नाही. जयंता नेहमी म्हणायचे मला, अर्धवट दोन चार ओळीं गुणगुणतेस त्यापेक्षा एखादी कविता पूर्ण लिहून ठेव.

"मग विचार कसला करताय?" आनंद

"कवितेच्या पुढच्या ओळींचा." रजनी

"चालू द्या. मी निघतो. आज प्रज्ञाला बाहेर जायचं आहे. घरकामाला बाई येणार. तेव्हा घरी थांबले पाहिजे." आनंद

"मी करते मेसेज तुम्हाला." रजनी

आता रजनीच्या मोबाइलमध्ये बऱ्याच कविता जमल्या होत्या. ग्रुपमध्ये पोस्ट करून ती दाद मिळवत होती. आनंदनी तिला मोबाइलमधले इतर गोष्टी वापरायला शिकवलं होतं. आता तर तिला सेल्फीसुद्धा काढता येत होती. तिने नीरवला बागेचे फोटो पाठवले.

काळ वेगाने पुढे सरकत होता. दोघे आठवणीत हरवत होते. एकमेकांच्या मैत्रीच्या आधाराने आयुष्यात पुढे जात होते. रजनीच्या आयुष्यात मैत्रीच्या रुपाने आनंद आला होता.

"सुनंदा, चहा ठेव ग. माझा आणि शारदाचा. ये बैस ना." रजनी

"का ग? कुठे हरवली होतीस? मी येऊन बराच वेळ झाला." शारदा बंगईवर बसत म्हणाली

"काही नाही ग. काल गौरी ताई बोलता बोलता टोमणा मारून गेल्यात." रजनी

"अगं त्यांचा कसला विचार करतेय. नीरवला माहिती आणि मला माहिती ना. शुद्ध मैत्री आहे तुम्हा दोघांची." शारदा

"हो. पण लोकं काय म्हणतील?" रजनी

"काळ बदलाय आता. स्त्री-पुरषांच्या मैत्रीकडे बघण्याची काही लोकांची मानसिकता बदलली नाही तर आपण आपले विचार, आपलं जगणं
सोडायचं का?" शारदा
"तसं नाही गं....पण...." रजनी

"आता पण बिण काही नाही हं. मैत्रीला वय नसतं. स्त्री-पुरुष भेद नसतो. शुद्ध मैत्रीला कोणाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नसते. सो लेट्स सेलिब्रेट लाइफ." शारदा

"जयंता म्हणायचा "लीव्ह एव्हरी मोमेंट" रजनी

"मग अशा लोकांच्या बोलण्याकडे लक्ष द्यायचे नाही." शारदा

"थँक्स ग." रजनी शारदाचा हात हातात घेत म्हणाली

"मी तुला शनिवारच्या कार्यकामाची आठवण करून द्यायला आले होते. बघितलं तर तू आपल्याच विचारात हरवलेली. तयारी झाली आहे ना?" शारदा

"हो" रजनीच्या डोळयात विश्वास होता

महिना अखेरचा शनिवार आला. कार्यक्रमाला जायच्या आधी रजनी जयतांच्या फोटोपुढे उभी होती.

जयंता, आज पहिल्यांदा चार लोकांसमोर मी माझी कविता सादर करणार आहे. खरं सांगू, तुझ्या टाळया ऐकायला आवडलं असतं." रजनीचे डोळे भरून आले.

"चलताय न." आनंदनी फाटकातून आवाज दिला

"हो आलेच" रजनी

"झाली ना तयारी." आनंद

"हो झाली तर आहे." रजनी

"जयंता जिथे असतील तिथे आनंद होईल त्यांना. आणि टाळ्या वाजवायला मी आहे आणि आपल्या सदानंद ग्रुपचे सदस्य आहेत न." आनंद हसत म्हणाला

"सदानंद, आपल्या या ज्येष्ठ नागरिक संघातील नवीन सदस्य रजनी लाखे कविता सादर करणार आहेत." शारदानी जाहिर केले आणि रजनी मोबाइल घेऊन पुढे आली.

"मौनाच्या भिंतीवर आदळून.......
उर्जा घेऊन एक प्रसन्न क्षण पुढे आला
त्याने शब्दांचे दान दिले
आणि उर्जा आणि उर्मीच्या लपंडावाच्या खेळात
अभिव्यक्तीचा प्रवास सुरू आहे....अविरत."

# अव्यक्त

सुमित्राचा समईसारखा शांत तेवणारा चेहरा आठवून मला गहिवरुन आलं.

कोण होती ही सुमित्रा? का एवढा जीव लावून गेली? कोणाची आठवण काढायला थोडंफार का होईना त्या व्यक्तिला विसरावं लागतं, या जन्मी तिला विसरणे मला शक्य नव्हते. आमच्यामधील अनामिक नात्याचा बंध खरंच कोणालाही उमजण्यापलीकडे होता. जरासा मोकळा वेळ मिळताच सुमीचा विचार करत बसायचं हा वर्षानुवर्षाचा माझा नाद. माझ्या संसाराच्या व्यापात मी तिच्या सहवासातील ते क्षण, तिचे अस्तित्व मनाच्या खोल कप्प्यात दडून ठेवलं होतं. आज सुमीचा विचार मनात डोकवताच जरा विचित्र वाटत होतं. उद्या सेवानिवृत्त होणार. मग काय आता तिचा विचार सतत पिंगा घालणार की काय? एका अनामिक जाणीवेनी मी शहारलो आणि आज मात्र ऐन दुपारी मला ती रात्र आठवली.

टप्पोऱ्या चांदण्यांच्या प्रकाशात आकाश लखलखत असतांना अचानक एका ताऱ्याच्या तुकड्याने जमीनीकडे झेप घ्यावी तशीच सुमित्रा माझ्या आयुष्यात आली होती. होळीच्या अदल्या दिवशीची ती रात्र होती. बारावीची परिक्षा जवळ आली होती. संदीप आणि मन्या नेहमीप्रमाणे अभ्यासाला आले होते. आमचा गच्चीवर अभ्यास सुरु होता.

"रमा, अरे जेवायला ये." आई

"हम्म, आलोच आई. पानं घे."

"चला रे, मन्या, संदीप चला, जेवून परत अभ्यासाला बसू."

अंगणात आम्ही तिघंही जेवायला बसलो होतो. जेवतांना अभ्यासाबद्दल बोलत होतो. तेवढ्यात सुमी आली.

"काय ग सुमे, काय आणलंस?" आई ने सुमीच्या हातातलं ताट बघून विचारलं.

"गरम गरम घावन आहेत ग, आईने पाठवले. तुझं करंजीच ताट होतं न ते घेऊन आले." सुमी

अरे व्वा, म्हणत आम्ही तिघांनी फडशा पाडला. आमचा ताव बघून सुमी हसत हसत घरी गेली.

सुमी, आमच्या शेजारी रहात होती. लहानपणी एकाच अंगणात खेळलो, मोठे झालो. ती आमच्याकडे वरचेवर यायची. निवडण-टिपण, पापड, कुर्डया, खारोड्या घालायला आईला मदत करायी. ती आर्ट्सच्या दुसऱ्या वर्षाला होती. मी आज प्रथमच सुमीला इतकं न्याहाळून बघितलं. खूप सुंदर दिसत होती. वेणीचा

शेपटा हालवत ती निघाली तेव्हा तिला पाठमोरी टक लावून बघत होतो. मन्याच्या खाकरण्याने मी भानावर आलो. तेव्हापासून सुमी माझ्या मनात घुटमळू लागली.

पेपररला जातांना रोज सुमी भेटायची. सायकल हातात घेऊन आळीच्या कोपऱ्यापर्यन्त सोबत यायची. शुभेच्छा देऊन पटकन निघून जायची. तिच्या उजव्या गालावर पडणारी खळी आजही आठवते.

बाराव्वीची परिक्षा संपली. मी सुमीशी बोलायच सतत निमित्य शोधत होतो. ओसरीवर बसून पुस्तकं वाचत रोज तिची वाट बघण्यात एक वेगळीच मजा वाटत होती.

कॉलेजवरुन ती एवढा उशिरा का येते ते कळत नव्हतं. पाठलाग करायचा एक दोनदा मनात विचार आला खरा. धाडस झालं नाही. एक दिवस दुपारी मित्रांसोबत क्रिकेट खेळून घरी परत असतांना मला सुमी सायकलवरुन गणपतीमंदीराकडे जातांना दिसली. खरतर ते मंदिर आडवाटेवर होतं, तिथे वर्दळही कमी असायची. तिचा पाठलाग करायची इच्छा अनावर झाली आणि मी तिच्या मागे निघालो. वडाच्या झाडामागे सायकल ठेवून ती तळ्याकडे वळली. एका झाडाच्या आडोशाला कोणीतरी तिची वाट बघत होतं. पाठमोरा असल्यामुळे तो इसम कोण ते मला कळलं नाही.

हातात हात घालून ते दोघं बराच वेळ तिथे बसले होते. त्या दोघांना तसं बसलेलं बघून माझ्या तळपायाची आग मस्तकात गेली होती. जसं ऊन उतरणीला लागलं, सुमी ड्रेस झटकत उठली. मी झाडाच्या आडोशाला गेलो. तो नक्की कोण होता हे मला बघायचं होतं. त्याला बघताच मस्तकात गेलेली आग आणखिनच भडकली.

दोघं मंदिराच्या वळणापर्यंत गेले. अमन डावीकडे वळला. सुमी उजवीकडे, आपल्या घराकडे निघाली.

हे प्रकरण जर सुमीच्या घरी कळलं तर? त्या क्षणी काय करावं सुचत नसलं तरी हे प्रकरण एकंदरित बरोबर नाही हे मला कळत होतं. हे जर असेच भेटत राहिले तर कोणानकोणाला कुणकुण लागणार हे नक्की होतं.

सुमी, एक हुशार मुलगी. ती या अमनसारख्या पोराच्या प्रेमात कशी काय पडली समजत नव्हती. अमन दिसायला जरी रुवाबदार असला तरी आम्हा पोरांच्या भाषेत सांगायचं तर तो एक नंबर चॅप्टर होता. सुमी-अमन प्रकरणाची हळुहळु गावात चर्चा होऊ लागली. पाठकांच्या घरी ही बातमी कळताच ज्वालामुखी फुटला. सुमीच्या वडिलांनी तिला खुप मारलं. संदीपदादा, तिच्या भावानं तिचं बाहेर येणं जाणं बंद केलं. सुमीचं कॉलेज, क्लास, मैत्रीणी सगळं सुटलं. तिच्या मैत्रीणी त्यांच्या घरच्यांचा धाक आणि संदीपदादाची दादागिरी यामुळे येत नव्हत्या. सुमी एकटी पडली.

झाल्या प्रकरणामुळे सतत हसणारी सुमी आता उदास राहू लागली. घरातली कामं आवरुन ती अंगण झाडायला, बगीच्यात पाणी घालायला, धुणी वाळत घालायला अंगणात यायची, मी तिला नेहमीच बघत बसायचो. या प्रकरणाला महिना दिड महिना झाला असेल. पाठकांच्या बंदोबस्तात कधीच शिथिलता आली नव्हती. गावात चर्चेला पेव नको म्हणून तिच्या मावशीकडे लातूरला दोन-तीनवेळेस दाखवण्याचा कार्यक्रम झाला, मात्र लग्न ठरलं नाही.

आई आजारी पडली आणि सुमीला आमच्याकडे यायचं निमित्त मिळालं. "तुझ्याकडे असतांना तिच्यावर नजर ठेव" संदिपदादाचा हुकुम होता. आईला मदतीच्या निमित्ताने सुमी आमच्याकडे वरचेवर येऊ लागली. माझा आणि तिचा संवाद वाढला. बा.भ.बोरकर ते हिटलर, सर्व विषयांवर आमची मुक्त चर्चा व्हायची. शिक्षण सुटल्याची तिची हळहळ मला कळत होती. ती अमनला विसरली असेल का? याचा थांग मला कधीच लागला नाही.

मन्या, संजय, परेश, दिन्याशी यावर बोललो तर या फंदात पडू नकोस त्यांनी मला सल्ला दिला.

"नसत्या भानगडीत पडू नको रम्या, तो संदीपदादा माहिती ना, त्याचा धाक अख्या राजापुरात आहे." परेश

"ती जायची निसटून आणि तू सापडायचा गोचीत" मन्या

पाठक कुटुंबाचा समस्त गावात दबदबा होता. राजकारणी लोकं ती. त्यांच्याबद्दल गावात नेहमीच चर्चा असायची. संदीपदादा एक युवा कार्यकर्ता होता.

मित्रांचं असं बोलणं आणि पाठकांचा असलेला दबदबा या दोघांत मी दबल्या गेलो.

सुमीचं आमच्याकडे येणं वाढलं होतं. आमची मैत्री बहरत होती. आम्ही एकमेकांशी खूप बोलत असलो तरी खळखळून हसणारी ती सुमी मला परत कधीच भेटली नाही. तिच्या गालावर खळी नंतर कधी पडलीच नाही. तिला शिक्षण पूर्ण करायचं होतं. मी तिला हवी असलेली पुस्तकं लायब्ररीतून आणून द्यायचो व परत करायचो. तिला सहामाही परिक्षेसाठी सोडायला संदिपदादा स्वत: जायचा आणि

हॉलबाहेर त्याचे पोरं पहारा द्यायचे. परिक्षेसाठी तिला हवं असलेल्या पुस्तकाचं नाव ती मला एका कागदावर लिहून द्यायची. ते सुद्धा तिचा भाऊ तपासून बघत असे. एकंदरीत ती नजरकैदेत होती. आईतर नेहमी म्हणायची लग्नझाल्यावरच तिची इथून सुटका होईल. या दोन-तीन महिन्यात मला सुमीकडून खूप काही शिकायला मिळालं. तिच्या वाचनाचा अवाका खूप मोठा होता. एक अमनचा विषय सोडला तर सुमी सारखी गुणी आणि हुशार मुलगी खरच सापडणं कठीण.

माझा निकाल लागला. मेरिट लिस्टमध्ये माझं नाव होतं. ८९% मिळाले होते. मला मॅकनिकल इंजिनीअरींग करायचं होतं. नांदेडच्या गवरमेंट इंजिनीअरींग कॉलेजमध्ये नंबर लागला. ऍडमिशनच्या धावपळीत सुमीशी नीट बोलणं झालं नाही. मी नसतांना तिच्यासाठी लायब्ररीतून पुस्तकं आणणं आणि परत करण्याची जवबदारी खुद्द संदीपदादानी घेतली होती. माझ्या नांदेडला जाण्याने सुमी एकटी पडणार होती. आमच्या चर्चा, गप्पा, राजकारण, समाजकारण यापुढे रंगणार नव्हतं. तिला माझ्या आईची सोबत असणार होती. यातच काय मी समाधान मानत होतो. मी सकाळच्या एस.टीने निघणार होतो. त्याच्या अदल्या दिवशी सुमी मला भेटायला आली.

"नीट रहा. खूप अभ्यास कर." सुमी

"मी तुझ्यासाठी काही करु शकत नाही याचं दु:ख आहे ग" मी म्हणालो

"नाही रे. खुप केलं तू माझ्यासाठी" सुमी आकाशाकडे बघत म्हणाली

"या पिंजऱ्यातून मी लवकर बाहेर पडणार. तुझ्या बाबांची दिवाळीपर्यंत इथे बदली होणार आहे, काल काकू सांगत होती. तोवर मी आई आणि आजी दोघींकडे लक्ष देईन. काळजी नको करु." सुमी

माझा हात हातात घेऊन ती खूप वेळ निशब्द बसली होती. त्या स्पर्शात विश्वास होता, जिव्हाळा होता. हे मैत्रीपलीकडचं प्रेम असलं तरी त्यात शारिरीक आकर्षण नव्हतं, त्याक्षणी अनामिक नातं दोघांना व्यक्त करायचं नव्हतं. ते असच रहाणार होतं. आम्ही असच त्या नात्याला जपणार होतो. तो आमचा एक निशब्द करार होता. मी निघतांना ती मनापासून हसली आणि तिच्या गालावरची खळी मी डोळ्यात साठवून घेतली.

एक अनामिक हुरहुर घेऊन मी नांदेडसाठी निघालो.

मी दिसेनासा होईपर्यंत ती फाटकात उभी होती.

कॉलेजची आणि हॉस्टेलची नवलाई नऊ दिवसात संपली. राजापूरचा रमाकांत नांदेडला येऊन धीट झाला होता. धीट झाल्यावर आधीच्या काही गोष्टींचा पश्चाताप होत होता, तो आता करुन उपयोग नव्हता. नवीन मित्र मिळालेत. मी अभ्यास आणि परिक्षा यात गुंतत गेलो. आईला रोज फोन करायचो. अधेमधे सुमीबद्दल विचारायचो.

तिच्या बोलण्यावरुन सर्वकाही नेहमीप्रमाणे सुरु असावं. इथे नांदेडला आल्यापासून सुमीशी बोलणं झालं नव्हतं. मी एकदोनदा दुपारी फोन लावून

बघितला. तेव्हा ती आमच्या घरी नव्हती. आईने सांगितलं सुमी डिस्टिंकशनने पास झाली. आईजवळ निरोप ठेवला.

ठरल्याप्रमाणे रविवारी दुपारी आईला फोन लावला. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर सुमीबद्दल विचारलं. आईने तिला फोन दिला.

"हॅलो, सुमी" मी रमाकांत

"बोल" सुमी

"अभिनंदन" मी

"काय करु या अभिनंदनाचं?" सुमी
यावर मला काय बोलावं सुचत नव्हतं.

"डिस्टन्स कोर्समार्फत तू तुझ शिक्षण पुर्ण करु शकते." मी

"गौरी-गणपतीला येत आहे. तेव्हा बोलू." ती काहीच बोलली नाही म्ह्णून मी बोललो

गौरी-गणपतीसाठी घरी गेलो. सुमीची भेट झाली. या तीन महिन्यात मी गेल्यावर तिच्यात बराच बदल झालेला दिसला. हसरी सुमी तर आधीच हरवली होती, आता ती गंभीर आणि शांत दिसत होती. आई आणि ती गौरीचा फुलोरा करत

होत्या. एकीकडे त्यांची सोवळयातली कामं सुरु होती आणि दुसरीकडे माझी बडबड. सुमी काहीच बोलत नव्हती. मी आईला खुणेने विचारलं.

"इनामदारांच स्थळ आलं आहे तिला." आई

"काय? ते सुकडं बोंबील, सुदीप." मी कपाळावर हात मारत विचारलं

"सुमी, नाही म्हण त्याला. एकदम थर्डक्लास मुलगा आहे. त्याचा चुलता माझ्या वर्गात होता." मी चिडून म्हंटलं

"तिच्या हातात नाही ना ते." आई

"तू मुक्त विद्यापीठातून तुझे शिक्षण पूर्ण करु शकते" मी तिचा पडलेला चेहरा बघून विषयांतर केलं.

"घरी अभ्यास करायचा. फक्त परिक्षा द्यायला सेंटरवर जायचं" मी समजवण्याच्या प्रयत्न केला

"तिच्या घरच्यांना कोण समजवून सांगणार?" आई

"आई, तू. तू समजवून सांगणार." मी

"मी? कसं शक्य आहे?" आई

"तू तिच्या आईशी बोल, त्या बोलतील संदीपदादा आणि काकांशी" मी आईला आग्रह केला

दोघांच्या विनवण्या ऐकून आई पाठककाकूंशी बोलायला तयार झाली. रजिस्ट्रेशनची प्रक्रिया तिला समजवून सांगितली. मन्याला तिला मदत करायला सांगितलं. चार दिवसाच्या त्या मुक्कामात सुमीशी मनसोक्त गप्पा करता आल्या नाही. घरचे मात्र तिच्या लग्नाची घाई करत होते एवढं मला लक्षात आलं होतं.मी निघतांना सुमी फाटकापाशी घुटमळत होती. कोणाचं लक्ष नाही बघून तिने माझ्या हातात एक पत्र दिलं.

"नांदेडला पोहचल्यावर पोस्ट कर, प्लीज" सुमी

"महत्वाचं आहे. घरच्यांना माहिती नाही. प्लीज" तिचे अश्रुंनी डबडबलेले डोळे बघून मी ते माझ्या बॅगमध्ये पटकन सरकवले

माझ्या डोळ्यात आश्वासनाची हमी बघून तिने मला कागदाच्या चिटोऱ्यावर माझा फोननंबर मागितला. तिच्या गालावरच्या खळीच्या आशेत मी होस्टेलचा फोननंबर दिला. कागदाचा तो चिटोरा घेऊन ती आत पळाली.

मी नांदेडला पोहचलो. सुमीने पोस्टात टाकयला दिलेल्या पाकिटावर पुण्याचा पत्ता होता. मला वाटलं तिने अमनला लिहिलं असावं. पण नाही त्यावर "सुमेधा पाटकर" लिहिलं होतं. मला ते नाव अनोळखी होतं. मी ते लगेच पोस्ट केलं.

अभ्यासात काळ कसा पुढे सरकला कळलं नाही. पत्राद्वारे आईकडून राजापूरचा हालहवाल कळत होता. आता दिवाळीशिवाय जाता येणार नव्हतं. मी सुमीच्या फोनची वाट बघत होतो. एका पत्रात आईकडून सुमीचं लग्न ठरल्याचं कळलं होतं. तिच्या साखरपुड्याबद्दल ऐकून मी दसऱ्याला गावी जायचा विचार करत होतो. सुमीचा फोन आल्याशिवाय फार काही कळणार नव्हतं. सुमीचा फोन आला नाही. आता वाट बघण्याशिवाय पर्याय नव्हता.

आणि चारपाच दिवसांनी सकाळी सकाळी मला फोन आला.

"हॅलो, रमाकांत....मी सुमी" पलीकडून आवाज आला

"सुमी, तू? कशी आहेस? कुठुन बोलतेस?"

"अरे हो, सांगते सगळं." सुमी

"हा नंबर सुमेधा मॅडमचा आहे. मी पुण्याला आहे. मी इथे कशी काय पोहचली नंतर सांगेन तुला. प्लीज माझ्या घरच्यांना कळू देऊ नको. मी इथे एका वसतीगृहात राहून आधी शिक्षण पूर्ण करणार. माझ्यासोबत सुमेधा मॅडम आहेत. काळजी करु नको. मी तुला नंतर फोन करते." सुमी

मला सगळं ऐकून धक्का बसला असला तरी सुमी त्या नजरकैदेतून सुटली याचा आनंद होत होता. तिनं तिथून पळ कसा काढला आसावा याचाच मी विचार करत होतो. या सुमेधा मॅडम कोण? हे मला माहिती नव्हतं. सुमीनं देलेलं ते पत्र आठवलं. त्या कोण? सुमीला कश्या ओळखतात? त्यांनी तिला मदत का केली? या प्रश्नांची उत्तरं नंतर सुमीकडून कळणार असली तरी सध्या ती निरुत्तरीत होती.

आईचं पत्र आलं होत.

"आजीची तब्येत आता बरी आहे, मध्यंतरी आजीच्या मोतीबिंदूच्या ऑपरेशनसाठी बाबा येऊन गेलेत. परेश दिन्या अधून मधून येत असतात. एक वाईट बातमी आहे, आपली सुमी पळून गेली. कशी, कुणासोबत ठाऊक नाही. दसऱ्याच्या अदल्या दिवशी साखरपुडा सुदिप इनामदारशी ठरला होता. तू दसऱ्याला येशील तेव्हा सविस्तर बोलूच" आई

मी आईला लगेच उत्तर लिहिलं, आई, एका दिवसासाठी मला येणं शक्य नाही. दिवाळीत भेटू.

मी दिवाळीत घरी जाईपर्यंत सुमी प्रकरण थोडं तरी निवळलं असावं या आशेत होतो. तिच्या माझ्यातील संवाद कुणालाच कळायला नको. आई, मन्या आणि परेशला सुद्धा नाही. परेशशी फोनवर बोलणं झालं. तो मध्यंतरी राजापुरला जाऊन आला होता. त्याच्याकडून कळलं संदीपदादाला अमनवर संशय होता. तो तर संदिपच्या धाकानं हैद्राबादला मामाकडे निघून गेला होता. संदीपदादाची पोरं

तिला शोधत आहेत हे कळल्यावर मी अजूनच सावध झालो होतो. अधूनमधून सुमीशी फोनवर बोलणं होत होतं. ठरल्याप्रमाणे दिवाळीत राजापुरला जातांना पुण्यात काही तास थांबून सुमीला भेटलो.

सुमेधा पाटकर यांचा प्रशस्त बंगला होता. पहिल्या भेटीत लक्षात आलं ते एक विलक्षण व्यक्तिमत्व होतं. वातावरण निवळेपर्यंत सुमी त्यांच्याकडे रहाणार होती. नंतर वसतीगृहात जाणार होती.

"रमाकांत, या सुमेधा मॅडम आमच्या कॉलेजमध्ये शिकवत होत्या. त्यांच्या मिस्टरांची बदली झाली आणि त्यांनी ती नोकरी सोडली. त्या माझ्या संपर्कात होत्या. माझं भाषेवरील प्रेम आणि प्रभुत्व बघून त्या मला लिहिण्यास आणि पुढच्या अभ्यासासाठी प्रोत्साहित करत होत्या." सुमी

"मला मुलबाळ नाही. सुमी माझ्या मुलीसारखी. रणजीत माझा भाऊ पोलिस खात्यात आहे. राजापूर ते दापोली या परिसरात तो नेहमीच जात असतो. सुमीच्या सुटकेसाठी मी त्याची मदत घेतली. मुख्य म्हणजे सुमीच्या घरच्यांना माझ्याबद्दल काही माहिती नाही." सुमेधा पाटकर

"काकुंनी मदत केली म्हणून मी तिथून निघू शकले. आपण दोघं संपर्कात आहोत हे मी काकुंजवळ बोलले नाही. हे सगळं अचानक घडलं. मला त्या सुदीप इनामदाराशी लग्न करायचं नव्हतं. साखरपुडा आठ दिवसांवर आला होता." सुमी

"माझा भाऊ रणजीत राजापुरला आधीच पोहचला होता. खरेदीसाठी सुमी बाहेर पडल्यावर संधीसाधून ती निसटणार होती. पण हिच्या भावाचे पोरं सतत हिच्या मागावर होते. त्यामुळे तेव्हा तिला निसटता आलं नाही." सुमेधा पाटकर

"एक दिवस तुझ्या आज्जीला बरं नव्हतं. घरात कोणी नसल्यामुळे सवयीप्रमाणे काकूंनी मला आवाज दिला. डॉक्टरांनी काही टेस्ट लिहून दिल्या. त्याच्या चौकशीचे निमित्त करुन दवाखानाच्या रिसेप्शन काऊंटरवरुन मी रणजीतमामांना फोन केला. ते दवाखान्याच्या मागच्या बाजूला गाडी घेऊन थांबले." सुमी

"माझ्यासोबत संदीपदादा स्वत: दवाखान्यात आज्जीला घेऊन आला होता. आई आज्जीला जेव्हा डॉक्टरांच्या खोलीत घेऊन गेली. मी तेव्हाच तिथून निसटली. त्याला वाटलं मी आत डॉक्टरांच्या केबीन मध्ये आहे. काकूंनी दादाला आजी आणि बोलण्यात गुंतवून ठेवलं. थोड्यावेळानं सर्वांना लक्षात आलं असेल, तोपर्यंत मी बरीच दूर निघून गेले होते. माझ्या मागावर त्याने त्याचे पोरं पाठवले होते. गावाच्या बाहेर नाक्यावर त्याचे पोरं येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या बघोते. मी पोलिसांच्या गाडीत असल्यामुळे सुरक्षित होते. गाडी अडवायची कुणाची हिम्मत झाली नाही." सुमी

"मी आता बी.एच्या तिसऱ्या वर्षाला ॲडमिशन घेत आहे. तू सांगितलं होतं न, डिस्टन्स एज्युकेशन. नंतर एम. ए., एम फिल आणि मॅडमसारखं कॉलेजमध्ये शिकवायचं आहे मला. आयुष्यात परत अशी संधी मिळणार नाही.

"आणि अमन?" मी विचारलं

"तो घाबरला. दादानी त्याला खूप मारलं, त्याच्या घरच्यांना धमकावलं. त्याला दोन बहिणी आहेत. त्या सर्वांच आयुष्य पणाला लावून मी त्याच्यासोबत कसा संसार करणार. दादानी त्याच्या पोरांना जेव्हा हैद्राबादला त्याच्या मागावर पाठवलं तेव्हांच मी त्याला विसरायचं निर्णय घेतला." सुमी

सुमीनी मन मोकळं केलं होतं. या आनंदातच मी राजापूर गाठलं. दरवर्षीप्रमाणे यंदाही मी पाठकांकडे दिवाळीच्या नमस्कारासाठी गेलो. अंगणात शास्त्रम्हणून छोटीशी रांगोळी बघून सुमीची आठवण झाली. तिचं अस्तित्व आता इथे नाही हे सांगणाऱ्या तिथे बऱ्याच खुणा होत्या. सुमी पळून गेल्याचं दु:ख सर्वांना असलं तरी तिच्या आई आणि वहिनीशिवाय कोणी उजागर कोणी करत नव्हतं. काही महिन्यांपूर्वी मला माझ्या शामळुपणाचा कधी कधी राग यायचा, मात्र आज पाठकांकडे माझ्या याच वृत्तीमुळे सुमीबद्दल कोणी शंका घेतली नसावी. इकडच्या तिकडच्या गप्पा करत मी तिथून निसटलो. मित्रांशी सुमी कशी? कुठे? कोणासोबत? पळाली यावर बोललो. त्यांचे अनेक तर्क वितर्क ऐकून मी चक्रावलोच. धामधुमीत दिवाळीची चार दिवसाची सुट्टी संपली. या चार दिवसात सुमीबद्दल आई माझ्याशी काही बोलते का मी वाट बघत होतो.

"एक चुकू झाली तिच्याकडून, त्या चुकीची जाणीव झाली. तिच्या घरच्यांनी तिला एकदा संधी द्यायला हवी होती." आई बोलता बोलता बोलली

"मीच तिला सांगितलं मला तू कुठे जाणार? काय करणार? सांगू नकोस. वय होत चाललं माझं, चुकुनही कुठे उल्लेख निघाला तर पोरीचं आयुष्य पार उध्वस्त होऊन जाईल." आई

त्याक्षणी आईचं मला कौतुक वाटलं. आता बाबांची बदली राजापूरला झाल्यामुळे मला आजी आणि आई दोघींची काळजी नव्हती. माझं इंजिनीअरींगच पहिल वर्ष कधी सरलं कळलं नाही. सुमीशी अधून मधून बोलणं होत होतं. तिचं शिक्षण व्यवस्थित सुरु होतं. आजी गेल्यावर तिचे दिवस करायला राजापूरला गेलो होतो. तिथे सुमी प्रकरण निवळलं होतं. संदीपदादा एका केस साठी पोलिसांच्या ताब्यात होता. निवडणूक हारल्यामुळे पाठक कुटुंबाचा दबदबा कमी झाला होता. नांदेडला निघायच्या दिवशी सकाळी मी अंगणात ओसरीवर बसलो होतो. कधीकाळी गजबजलेलं पाठकांच घर आज रुक्ष वाटत होतं.

काळ भराभर पुढे जात होता. शिक्षण संपलं. नौकरी लागली. नेहमीप्रमाणे सुमीशी फोनवर नियमित बोलणं आणि कधीतरी पुण्याला गेल्यावर तिची भेट व्हायची. एका भेटीत तिच्या गळयात मंगळसुत्र बघितलं आणि मी चरकलोच.

"फोनवर तरी सांगायचं न सुमी?" मी मंगळसुत्राकडे बघत विचारलं

"अरे, खुप घाईघाईत ठरलं सगळं. कोर्टात जाऊन केलं रे लग्न." सुमी

"नाव तरी सांगशिल का?" मी मनातील राग ओठावर न येऊ देता विचारलं

"डॉ. अमोल कुलकर्णी. माझ्याच कॉलेजमध्ये लेक्चरर आहे." सुमीने आनंदात सांगितलं

सुमी भरभरुन बोलत होती. मी ऐकत होतो. तिच्या बोलण्यात फक्त ती आणि तिचं स्वप्न तिच्या आकांक्षा होत्या. त्यात मी कुठे नव्हतोच. मग आजवर आमच्यात कोणत्या नात्याचा ओलावा होता? खरं तर तिच्या एकतर्फी बोलण्याचा खूप राग आला होता. तिच्या गालावर पडलेली खळी बघताच राग कुठल्याकुठे निवळला कळलच नाही.

ती तिच्या संसारात मग्न झाली...काही काळाने मी माझ्या. तिच्यासाठी राजापूर केव्हाच सुटलं होतं. बाबांना अचानक ह्दयविकाराचा झटका आला आणि ते तडकाफडकी गेले. आईला मी मुंबईला घेऊन आलो. आणि माझं राजापूर सुटलं ते कायमचं. जीवापाड असलेली तिथले मित्र आता आठवणीतच उरले. सुमीला हवे असलेले सर्व सुख तिला मिळु दे ही प्रार्थना तिच्या लग्नाआधी मी करत होतो. नंतरही करत राहिलो. एक लक्षात आलं वाढत्या वयासोबत माझा तिच्यावरचा राग ओसरला होता आणि संवाद तर केव्हाच संपला होता.

मी माझ्या आयुष्यात सुखी झालो असलो तरी या अनामिक नात्याची वीण माझ्या मनात, माझ्या या देहात कुठेतरी खोलवर रुजलेली होती.

आमच्या नात्यातील हा प्रश्न ही अनुत्तरीत रहाणार माहिती असून मी तिच्या विचारात आजही हरवतो....हरखतो....

आज असाच सुमीच्या विचारानं मी व्याकुळ झालो. आमच्यात काय नातं होतं? मैत्रीच्या पलीकडचं असलं तरी प्रेम नव्हतं का? मग प्रेम म्हणजे नक्की काय? फक्त आकर्षण? माझ्या कुठल्याच प्रश्नांची उत्तरं मला कधीच मिळणार नव्हती हे मला माहित असलं तरी प्रश्न पडायचे थांबतात का? सुमीची आठवण आली त्या आठवणींसोबत ते प्रश्न येतातच. माझ्या आयुष्यात हे सारं काही अनुत्तरीत आणि अव्यक्त होतं हे ही तेवढच खरं.

अनेक वर्षांनी फेसबुकवर सारे जुने मित्र मैत्रीणी भेटलेत. सवयीप्रमाणे मी घरातल्यांची नजर चुकवत सुमित्रा अमोल कुलकर्णीचा प्रोफाईल चेक करतो. फ्रेंड रिक्वेस्ट पाठवायला हात थरथरतात. फेसबुकवर फोटोमधला तिचा आनंद बघून आजही मी मनोमन आनंदित होतो.

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सतरावे वर्ष.

# विनीता देशपांडे यांचे हे आठवे पुस्तक.

विनीता देशपांडे या संस्कृत आणि इंडॉलॉजीच्या अभ्यासक आहेत. त्यांचे या विषयांतले कार्य सातत्यऊर्ण सुरू असते. याशिवाय त्या व्यावसायिक अनुवादकही आहेत. विनीताजींचे कार्यक्षेत्र केवळ लेखनापुरते मर्यादित नसून त्या होप ऍन्ड हॅप्पीनेस फाँऊंडेशनची संस्थापक आहेत, तसेच अनेक सामाजिक उपक्रम ई-कचरा संकलन, गरजूंसाठी शालेय साहित्य संकलन, वृद्धाश्रमासाठी उपक्रम, विशेष मुलांसाठी उपक्रम, 10000books.in ची एन.जी.ओ.पार्टनर असा विविधांगांनी पसरलेला आहे.

विनीता देशपांडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (१०), डॉ. नितीन मोरे (५२ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (११), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (८),

उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (७), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखा्नीस (३), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (४), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

# आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
# दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।